बुधवार, १६ ऑगस्ट २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - २०

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • WEDNESDAY 16 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-20 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5


महत्त्वाची बातमी

## लडाखमधील ६ हजार ७० मीटर उंच शिखरावर फडकवला तिरंगा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माउंट उटी कांगरी हे भारतातील लडाख येथील गिर्यारोहणाचे ठिकाण. या ठिकाणी शिखर ६ हजार ७० मीटर (१९,९१५ फूट) उंच आहे. त्यामुळे या उंचीवर जाण्याचे धाडस सहसा कुणी करत नाही. उटी कांगरी येथे चढण्याच धाडस केल्यास तिथं जाण्याचा अनुभव, शारिरीक आणि मानसिक दृष्ट्या कणखर असावे लागते. मध्यम तसेच कठीण श्रेणीत गणला जाणारा माउंट उटी कांगरी गिर्यारोहकांचा चांगलाच कस काढतो. ७० अंशाच्या कोनात हे शिखर आहे. अंगावर येणारी चढाई चढताना आईस एक्स आणि क्रंपोन अश्या उपकरणाचा येथे चढण्यासाठी आधार घ्यावा लागतो. लडाखमधील माउंट युटी कांगरी हे ६ हजार ७० मीटर उंच शिखर. हे उंच शिखर सर करत भारताचा ७६ वा स्वतंत्रता दिवस महाराष्ट्रातील गिर्यारोहकांनी साजरा केला. या गिर्यारोहकांच्या टीममध्ये सोलापूरमधील गिर्यारोहक बालकृष्ण जाधव, नीलेश माने (कल्याण) आणि मुंबईतील गिर्यारोहक वैभव ऐवळे यांचा समावेश आहे.

महाराष्ट्राची टीम ९ ऑगस्ट रोजी मुंबईहून या उंच शिखरावर चढण्यासाठी गेली. दोन दिवस लेहमध्ये वातावरणाशी जुळवून घेतले. ११ ऑगस्ट रोजी जवळपास ९० किलोमीटरचा प्रवास केला. टीमने रूमतसे गावातून ट्रेकला सुरुवात केली. हे गाव जवळपास ४३०० मीटर उंचीवर आहे. महाराष्ट्रातील गिर्यारोहकांच्या टीमने २ तासाचा ट्रेक करत ४ हजार ८०० मीटर उंची गाठली. बेस कॅम्पला रात्रीचा मुक्काम ठोकला.

# २०२४ साठीही मला आशीर्वाद द्या

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : लाल किल्ल्यावरुन देशवासीयांना आवाहन



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : २०१४ मध्ये मी तुम्हाला परिवर्तन घडेल असे आश्वासन दिले होते. त्यावेळी तुम्ही माझ्यावर विश्वास दाखवलात आणि मला या सर्वोच्च पदावर बसवले. २०१९ मध्ये तुम्ही सगळ्यांनी माझ्यावर पुन्हा विश्वास दाखवला आणि आशीर्वाद दिला. आता २०२४ साठीही मला आशीर्वाद द्या. पुढच्या १५ ऑगस्टला मी पुन्हा तुमच्यासमोर येईन. मी तुमच्यासाठीच जिंकतो आहे, जिंकेन. मी जे कष्ट उपसतो आहे ते तुमच्यासाठीच आहेत. कारण सगळे भारतीय हे माझे कुटुंब आहेत. मी तुमचे दुःख सहन करु शकत नाही, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पुढच्या टर्ममध्येही आपणच पंतप्रधान असू हा विश्वास व्यक्त केला.**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मंगळवारी देशाला लाल किल्ल्यावरुन संबोधित केले. १५ ऑगस्टच्या निमित्ताने देशाला त्यांचे हे दहावे संबोधन होते. बिगर काँग्रेसी पंतप्रधानांपैकी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे असे एकमेव पंतप्रधान आहेत ज्यांनी सलग दहावेळा लाल किल्ल्यावरुन देशाला संबोधित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या भाषणात दहा वर्षांच्या कार्यकाळाचा लेखाजोखा मांडला. तसंच काँग्रेसवर कडाडून टीका ही केली. भ्रष्टाचाराच्या राक्षसाने आपला विळखा देशाभोवती घातला होता आणि देशाला घट्ट पकडून ठेवलें होते असे म्हणत त्यांनी काँग्रेसवर टीका केली. तर दुसरीकडे पुढच्या वर्षी म्हणजेच २०२४ मध्येही आपणच लाल किल्ल्यावरुन भाषण करु असा विश्वासही व्यक्त केला.

आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मणिपूरचाही उल्लेख केला. मणिपूरमध्ये आणि हिंदुस्थानच्या इतरही काही भागात हिंसाचार झाला. आई-बहिणींच्या सन्मानाला धक्का लावण्यात आला. देश मणिपूरच्या पाठिशी आहे. मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मणिपूरमधील समस्येवर शांततेतून तोडगा काढणार आहे. मणिपूरमध्ये केंद्र आणि राज्य सरकार शांतता राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत आणि करत राहू. असेही मोदींनी म्हटले आहे.

लाल किल्ल्यावरून पंतप्रधान मोदी म्हणाले, आज देशातील तरुणांना जेवढे भाग्य लाभले आहे तेवढे क्वचितच कुणाला मिळते.आपण ते गमावू नये. येणारा काळ हा तंत्रज्ञानाच्या प्रभावाचा असणार आहे. आपली छोटी शहरे आणि शहरे लोकसंख्येच्या दृष्टीने लहान असतील पण त्यांची क्षमता कोणापेक्षाही मागे नाही. देशात संधींची कमतरता नाही. आपल्याला पाहिजे तितक्या संधी देण्याची क्षमता या देशामध्ये आहे. बदलत्या जगाला भारत आकार देणार आहे.

## टमाटे ५० रुपये किलोने विकण्याची सरकारची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने टोमॅटो 50 रुपये किलोने विकण्याचा निर्णय घेतला आहे. भाज्यांच्या वाढलेल्या किमतींमुळे, विशेषतः महागलेल्या टोमॅटोंच्या किमतींमुळे जुलै 2023 मध्ये अन्नधान्य महागाईचा दर 11.51 टक्क्यांवर पोहोचला आहे. यानंतर 15 ऑगस्ट 2023 पासून स्वातंत्र्य दिनाच्या शुभ मुहूर्तावर सरकारने टोमॅटो ५० रुपये किलोने विकण्याची घोषणा केली आहे. केंद्राच्या ग्राहक व्यवहार विभागाने एनसीसीएफ आणि नाफेडला टोमॅटो 50 रुपये किलोने विकण्याच्या सूचना दिल्या आहेत. अलीकडच्या काळात घाऊक बाजारात टोमॅटोच्या किमतीत घट झाली असल्याचं ग्राहक व्यवहार मंत्रालयाने सांगितलं आणि त्यामुळे टोमॅटो ५० रुपये किलोने विकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



मंत्रालयाने सांगितलं की, 14 जुलै 2023 पासून दिल्ली-एनसीआरमध्ये स्वस्त दरात टोमॅटोची विक्री सुरू झाली आहे. 13 ऑगस्ट 2023 पर्यंत नाफेड आणि एनसीसीएफने किरकोळ बाजारात 15 लाख किलो टोमॅटोची खरेदी आणि विक्री केली आहे. दिल्ली एनसीआर व्यतिरिक्त राजस्थानमधील जोधपूर कोटा, उत्तर प्रदेशातील लखनऊ, कानपूर, वाराणसी, प्रयागराज आणि बिहारमधील पटना, मुझफ्फरपूर, आराह, बक्सरमध्ये टोमॅटो स्वस्त दरात विकले गेले आहेत.

प्रथम एनसीसीएफ आणि नाफेडने टोमॅटो 90 रुपये प्रतिकिलो दराने विकण्यास सुरुवात केली, त्यानंतर 16 जुलै 2023 पासून दर 80 रुपये प्रति किलोपर्यंत कमी केले. 20 जुलैपासून दर 70 रुपये करण्यात आले आणि आता स्वातंत्र्य दिनापासून टोमॅटो 50 रुपये किलोने विकला जाणार आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाने सांगितल्यानुसार, एनसीसीएफने दिल्लीतील 70 ठिकाणी आणि नोएडा ग्रेटर नोएडामधील 15 ठिकाणी मोबाईल व्हॅन बसवून सर्वसामान्यांना स्वस्त दरात टोमॅटो विकले आहेत. एनसीसीएफने ओएनडीसी मार्फत स्वस्त दरात ऑनलाईन टोमॅटो विकत आहे. ग्राहक व्यवहार विभाग, एनसीसीएफ आणि नाफेडने आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये या टोमॅटोची खरेदी-विक्री केली आहे. या राज्यांत एका महिन्यात टोमॅटोची किंमत खूप वाढली आहे आणि या राज्यात टोमॅटोचा वापर देखील जास्त आहे. गेल्या काही दिवसांपासून टोमॅटो भलताच फॉर्मात होता, यामुळे कधी नव्हे ते शेतकऱ्यांना चार पैसे मिळत होते. मात्र अशातच केंद्र सरकारच्या निर्णयानंतर टोमॅटोच्या दरात घसरण झाली आहे. नाशिकच्या सर्वच बाजार समित्यांमध्ये जवळपास पन्नास टक्के दाराची घसरण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

## सुलभ इंटरनॅशनलचे संस्थापक बिंदेश्वर पाठक यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सुलभ इंटरनॅशनलचे संस्थापक बिंदेश्वर पाठक यांचे निधन झाले आहे.



नवी दिल्लीतील एम्समध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सुलभ इंटरनॅशनलच्या मध्यवर्ती कार्यालयात ध्वजारोहणानंतर त्यांची तब्येत अचानक खालावल्याने त्यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यांची प्राणज्योत मालवली. सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशनची स्थापना दिवंगत बिंदेश्वर पाठक यांनी १९७० मध्ये केली होती. बिंदेश्वर पाठक यांची ओळख भारतीय समाजसुधारकांपैकी एक म्हणून आहे. त्यांनी सुलभ इंटरनॅशनलची स्थापना केली, जी मानवी हक्क, पर्यावरणीय स्वच्छता, ऊर्जेचे अपारंपरिक स्त्रोत, कचरा व्यवस्थापन आणि सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करते. तीन दशकांपूर्वी डिझाइन केलेल्या सुलभ टॉयलेटला किण्वन संयंत्रांशी जोडून त्यांनी बायोगॅस निर्मितीचा अभिनव प्रयोग केला. जगभरातील विकसनशील देशांमध्ये स्वच्छतेचा समानार्थी शब्द त्यांच्यामुळेच निर्माण झाला असल्याचे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# झाड झडुले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना.. पत्थर सब ही बॉम्ब बनेंगे

## स्वातंत्र्य लढ्यातील ते १६ वीर योद्धे.. चिमूर क्रांतीची वेगळी ओळख


आधुनिक केसरी न्यूज


धनंजय साखरकर

चंद्रपूर : झाड झडुले शस्त्र बनेंगे ,भक्त बनेगी सेना .. पत्थर सब ही बॉम्ब बनेंगे.... यासारखी क्रांतिकारी भजने गात ज्यांनी स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा मनामनात जागविली अशा वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून क्रांतीजिल्हा म्हणून ओळख असलेल्या चिमूर तालुक्यातील तळोधी ( नाईक ) या गावातील एक दोन नव्हे तर तब्बल १६ युवक पेटून उठले आणि त्यांनी तळोधी ( नाईक ) ते चिमूर अशी पाच किलोमीटर ची पदयात्राच काढली. केवळ स्वातंत्र्य सैनिकांना मदत करता यावी यासाठी. १६ ऑगस्ट १९४२ चा तो ऐतिहासिक दिवस. चिमूर क्रांती लढ्याचा . याच लढ्यात सहभागी होण्यासाठी तळोधी ( नाईक) येथील १६ युवक क्रांतिकारकांच्या मदतीला हात द्यावा म्हणून आपल्या गावावरून पैदल यात्रा करत चिमूरमधे दाखल झाले. क्रांतिकारकांनी जी कामे सांगीतली ती त्यांनी पार पाडली आणि यासाठी पुढे त्यांना ईंग्रज सरकारच्या कारावासाची शिक्षाही सहन करावी लागली. ईंग्रजांच्या काळात स्वातंत्र्य सैनिकांना केलेली मदत म्हणजे ईंग्रज सरकार विरुद्ध केलेले बंडच. या बंडात तळोधी (नाईक) या एकाच गावातील तब्बल १६ युवक सहभागी होण्याची चिमूर नंतरची ही पहिलीच घटना. या बंडासाठी ज्या तरुणांना कारावासाची शिक्षा झाली त्यात कवडू तानबा मेश्राम, झिंगरू उंदरू सावरे, आडकू शिवाय सोनवणे, लहानू देवाची सोनवणे, जागो शेगू गजभे, लहानू श्रावण वाकडे, सोमा धोंडू दडमल, कवडू तुकाराम सेंदरे, बागा रघा रणदिवे, हनबा कान्हू चौधरी, महादेव दिसू येसांब्रे, नत्थू कोयचाडे, सोनबा बारेकर, नत्थू गिरी, भिवापूर सेंदरे, रामा पैकू मेश्राम



या सोळा तरुणांचा समावेश होता. राष्ट्रसंतांच्या भजनाने प्रेरित होत क्रांतिकारकांच्या खांद्याला खांदा लावून आपली जबाबदारी पार पाडत असतांना या तरुणांनी आपल्या कार्याचा एक आदर्श आज समाजासमोर ठेवलेला आपण पाहतो आहे. १६ ऑगस्ट १९४२ ला चिमूर मधे सर्वत्र ईंग्रज राजवटी विरोधात जाळपोळ, प्रचंड गोळीबार होत असतांनाच चिमूर च्या क्रांतिकारकांनी पोलीस स्टेशन सह त्यांच्या घरांच्या वस्तीलाही आग लावून पेटवून दिले. परंतू हे करत असतांनाही , विरोधाची ज्वाला मनामनामधे भडकलेली असतांनाही क्रांतिकारकांनी पोलिसांच्या वस्तीला आग लावतांना पोलिसांच्या कुटुंबियांना मात्र सुखरूप बाहेर काढून मग आगी लावल्या होत्या हे विशेष. संपूर्ण चिमूर परिसरातील प्रत्येक गावातील दोन चार तरून या लढ्यात सहभागी होतेच पण , तळोधी ( नाईक) या गावातील तब्बल १६ युवकांनी या लढ्यात सहभागी होत आपले योगदान दिले आहे. याचेच स्मरण म्हणून ग्रामपंचायत परीसरात स्मारक उभारण्यात आले आहे. आजच्या तरुणाईने हा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवत वाटचाल करणे हेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त असलेली त्या विर योद्ध्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तुम्ही कुस्तीच्या डावातला ' धोबीपछाड ' शब्द ऐकला असेल. खेळातील ही युक्ती अवलंबून ते आपल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करीत. धोबीपछाड हा डाव यांनीच शोधला बरं का ! ' पिंकी हसत म्हणाली, ' आई, धोबीपछाड देणे या वाक्प्रचाराचा अर्थ आता कळला बघ. ' पण आई इतर लोकांची काय कामे होती ते पण सांग ना ' ' हो हो सांगते ना. गावातील लोकांच्या विविध गरजा हे लोक पुरवायचे. त्यांना त्यांच्या व्यवसायानुसार नावं पडली. आपल्याला रोजच्या स्वयंपाकासाठी तेल लागते. गावात तेलाचे उत्पादन करण्याचे काम तेली करीत. सोनार लोक दागदागिने, देवांच्या मूर्ती बनवत. शेतात फळे, फुले, भाज्या पिकवणे हे काम माळी करत. देवांची पूजा करणे, मंदिरांची व्यवस्था राखणे आदी कामे गुरव करत. कोळी समाजातील लोक नदीच्या पुरावर लक्ष ठेवणे, गावाच्या संरक्षण व्यवस्थेकडे लक्ष ठेवणे आदी कामे करत. पूर्वी महार म्हणून उल्लेखल्या जाणाऱ्या बहुतेकांनी बौद्ध धर्म स्वीकारला आहे. त्यांना नवबौध्द असे म्हटले जाते. ते आणि मांग किंवा मातंग समाजातील लोक चौकीदारी करणे, ओरडून दवंडी देणे अशी कामं ही मंडळी करीत. त्याचप्रमाणे केकती पासून दोर वगैरे तयार करणे, झाडू तयार करणे, घरांची तोरणे तयार करणे आदी कामे ते करत. मातंग समाजातील लहुजी वस्ताद यांच्या तालमीत अनेक शूरवीर तयार झाले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी या वीरांनी स्वतःला झोकून दिले. ' आई, ही सगळी मंडळी किती महत्वाची कामे करीत होती नाही ? गावातील लोकांच्या सगळ्या गरजा त्यातून नक्कीच भागत असतील. ' राजेश म्हणाला. ' हो, अरे पूर्वीचं ग्रामीण भागातील लोकांचं सगळं जीवनच या लोकांवर अवलंबून असायचं. शिवाय या सगळ्या बारा बलुतेदार लोकांमुळे एकमेकांच्या गरजा भागायच्या. त्यामुळे सगळे एकोप्याने राहत होते. प्रत्येकाचेच काम महत्वाचे होते. त्यामुळे गावात शांततेचे वातावरण असायचे. काही वाद झाले तरी गावातच पंचायतींमार्फत लोकांचे प्रश्न सोडवले जायचे. त्यात दोन्ही बाजूंच्या लोकांचे समाधान व्हायचं बरं का !'श्यामलाताई म्हणाल्या. ' वा वा श्यामल, छान माहिती सांगितली बरं का मुलांना, ' श्यामराव म्हणाले. मी पण तुम्हाला एक दोन गोष्टी सांगतो, गाडी चालवता चालवता, चालेल ना ? की आईचंच ऐकायचंय ? श्यामराव हसत हसत उदगारले. ' अहो बाबा, तुमचं ऐकायला आम्ही नेहमीच उत्सुक असतो. तुम्ही काहीतरी वेगळी माहिती सांगता. तुम्ही सांगा ना या बारा बलुतेदारांबद्दल काहीतरी. मी घरी गेल्यावर ही सगळी माहिती छान लिहून काढणार आहे.



समृद्ध प्राचीन वारसा



# आनंदी पहाट

## प्रत्येकाला समजून सांगण्यापेक्षा समजून घेण्याची गरज

आधुनिक केसरी

एकमेकांचं ताळतंत्र, थोडं का होईना, पण सांभाळायला लागतं. संवादाचं सुख ही ज्याची त्यानी अनुभूती घेण्याची बाब असते. स्वतःच भावनिक, मानसिक, आंतरिक आणि शारीरिक पातळीवर प्रत्येक संवाद घडवून आणायचा असतो. ह्या सर्वच बाबींचं समीकरण कसं मांडायचं हे ज्याला माहिती होतं, त्याला संवादात पूर्णपणे सहभागी होऊन त्या संवादाचं सुख प्राप्त करून घेता येतं. संवादाचं सुख प्राप्त करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार अंगीकारण्याची गरज असते. खरं तर हा पूर्णपणे त्या नेतृत्वाचा प्रभाव असल्याचं दिसून येतं. नेतृत्वामध्ये समजावून सांगण्यापेक्षा समजून घेण्याची गरज लक्षात घ्यावी लागत असते. ह्याची काहीवेळा नेतृत्वाला जाणीव रहात नाही, पर्यायानं त्याच्या नेतृत्वाला कर्तुत्वाची उणिव असल्याचं समजलं जातं. नेतृत्वामध्ये वक्तृत्वाचा आभाव असून चालत नाही ह्याची जाणीव सतत ठेवणं महत्वाचं असतं. ह्यासाठी नेतृत्व कौशल्य असणं आवश्यक ठरत असतं. नेतृत्व करण्यामध्ये व्यक्तींच्या समूहाला आपलंसं करणं महत्वाचं असतं. नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच्या वक्तृत्वामुळे आणि कर्तुत्वामुळे कोणत्याही व्यक्तींचा समूह विश्वासानं, आदरानं, प्रेमानं, काही ठराविक अपेक्षेनं एकत्र येतो, सहभागी होत राहतो, नेतृत्व म्हणेल - सांगेल ते ऐकायला तयारही होत राहतो. जेव्हा दोन पेक्षा अधिक व्यक्तींचा समूह तयार होतो, तेव्हा समूहाच्या आवश्यकतेनुसार कमी अथवा अधिक संख्या ठरत असते. समूह संवादाचे रूप म्हणजे जनसंवाद. यामध्ये संप्रेषक आणि श्रोता यांचा थेट संवाद प्रस्थापित न होता तो एखाद्या जनसंवाद माध्यमाद्वारे प्रस्थापित होतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

देहरूप झाला | आत्माराम ||
आषाढीची वारी | श्रावणाच्या सरी ||
रानात उभारी | चैतन्याची ||१||
भक्तीत फूलला | सावताचा मळा ||
अभंग सोहळा | मंदिरात ||२||
जनाईची ओवी | जात्यासंगे फिरे ||
जन्माचे या फेरे | मुक्त झाले ||३||
ज्ञानाई-तुकाई | अद्वैताचे लेणे ||
कैवल्य चांदणे | भिमातीरी ||४
श्रावण सरीत | सावळा भिजला ||
देहरूप झाला | आत्माराम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

स्थातव्यं च त्वया देवि निर्मले मम मानसे |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ६६ ||
हे देवी, माझ्या निर्मल मनामध्ये तू रहावेस. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मन व बुद्धि साधन नहीं, अन्य:करण विलीन ।
प्राण चक्र नहीं खेल है, भजन भेद समचीन
।।३७।।(स्वर्वेद पंचम मण्डल षोडश अध्याय) ०५/१६/३७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
भक्ती ही मन-बुद्धीची साधना नाही किंवा प्राण-चक्रांचा खेळही नाही. अंत:करण (मन, बुद्धी, चित्त, अहंकार) विलीन, शांत झाल्यावर सत्य चेतन-भेदा द्वारे प्रभूची भक्ती होते. आत्म्याची चेतन क्रिया भक्ती आहे, जिथे जड प्रकृतीचा नितांत अभाव होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

आगळें पाउल जिंके एकाएक । पावसी मान हे मानवती तिन्ही लोक ॥४॥ तुका म्हणे तुजमजमध्यें एक भाव । सम तुकें बार घेऊं पावों उंच ठाव ॥५॥ फुगडी फू सवती माझे तूं । हागुनि भरलें धू तुझ्या ढुंगा तोंडावरि ॥१॥ फुगडी घेतां आली हरी । ऊठ जावो जगनोवरी ॥ध्रु.॥ हातपाय बेंबळ जाती । ढुंगण घोळितां लागे माती ॥२॥
सात पांच आणिल्या हरी । वांचुनी काय तगसी पोरी ॥३॥
सरला दम पांगले पाय । आझुनि वरी घोळिसी काय ॥४॥
तुका म्हणे आझुन तरी । सांगितलें तें गधडी करी ॥५॥
लये लये लखोटा । मूळबंदि कासोटा । भावा केलें साहें । आतां माझें पाहें हातोहातीं गुंतली । जीवपणा मुकली । धीर माझा निका । सांडीं बोल फिका अंगीकारी हरि । नको पडों फेरी । लाज धरीं भांडे । जग झोडी रांडे ॥३॥ बैस भावा पाठीं । ऐक माझ्या गोष्टी । केला सांडीं गोहो । येथें धरीं मोहो ॥४॥ पाठमोरा डोल । आवरी तें बोल । पांगलीस बाळा । पुढें अवकळा ॥५॥ आतां उभी ठायीं । उभाउभीं पाहीं । नको होऊं डुकरी । पुढें गाढव कुतरी ॥६॥ नामा केलें खरें । आपुलें म्या बरें। तुका म्हणे येरी । पांगविल्या पोरी ॥७॥
तुशीं कोण घाली हुंबरी । साही पांगल्या अठरा चारी ॥ध्रु.॥ सहस्त्र मुखावरी हरी । शेष शिणविलें ॥१॥ चेंडुवासवें घातली उडी । नाथिला काळिया देऊनि बुडी ॥२॥ अशुद्ध पीतां करुणा नाहीं । तुवां माउशी ही मारियेली ॥३॥

# आपल्याला सद्गुरुचा आधार वाटावा

आधुनिक केसरी

वेळप्रसंग येईल तसे वागणे उचित आहे, आणि त्याबद्दल मनावर परिणाम होऊ देऊ नये. परमात्म्याच्या चिंतनात मन गुंतले असताना अवांतर गोष्टींचा परिणाम त्यावर होत नाही. जेवढे झेपेल तेवढेच करावे. अभ्यास करावा पण काळजी न करता. सर्वस्वी भार भगवंतावर ठेवून निवांत असावे. आपल्या मनाचे स्वास्थ्य बिघडू न देता आनंदात रहावे. वृत्ती आवरून आवरत नाही; ती परमात्म्याकडे लावली म्हणजे आवरते. रामइच्छेने सर्व चालते असे लक्षात ठेवावे. संकट, आनंद, दोन्ही भगवंताला सांगावीत. ज्या स्थितीत भगवंताने ठेवले त्या स्थितीत समाधान मानावे.



अंतःकरणात सुप्त असलेले भगवंताचे प्रेम जागृत होण्यासाठी काही निमित्त लागते. तीर्थयात्रा आणि साधुसंतांची भेट हेच ते निमित्त होय. श्रीरामचंद्रही तीर्थयात्रेला जाऊन अनेक संतांची दर्शने घेऊन आले. संतांच्या अहंकाराला जिवंत राहताच येणार नाही. कारण 'परोपकार' करायला लावणार 'पर'च ठिकाणावर नाही, तर मग 'दुसऱ्याकरिता मी काही केले' ही भावना व्हायला आधारच कुठे राहिला ? विषयाच्या लालसेने सत्समागम करणे हा खरा सत्समागम नव्हे. संत कधीकधी आपल्याला विषय देतात खरे, पण एकंदरीत आपल्याला विषयाचा वीट आणण्याचाच त्यांचा प्रयत्न असतो. संताच्या घरी नुसते पडून राहिल्यानेही शुद्ध भाव येईल. भगवंताच्या नामातच संतसंगती आहे, कारण नामाच्या मागे भगवंताचे अस्तित्व आहे. विषयाची ऊर्मी हे मायेचे स्मरण होय, आणि नामाचे स्मरण हे भगवंताचे स्मरण होय. तपश्चर्येचे सर्वांत शेवटचे फळ काही असेल तर परमेश्वराच्या ठिकाणी अनन्यभावाने शरण जाण्याची बुद्धी होय. ती बुद्धी आपल्याला झाली पाहिजे. एकदा शरण गेल्यावर आपण उरूच शकत नाही; त्यालाच शरणागती म्हणतात; आणि हीच परमार्थातली अत्यंत श्रेष्ठ गती आहे. आपण आपल्या सद्गुरूचे आहोत असे छातीठोकपणे सांगत चला. काही नाही केलेत तरी चालेल, पण आपले सद्गुरू आपल्या मागेपुढे आहेत अशी दृढ भावना असावी. मला सुखदुःख दोन्ही नाहीत. पण तुम्ही दुःखी झालात तर मला दुःख होते. तेव्हा तुम्ही मनाला दुःखच होऊ नये असे वागा. प्रपंची माणसाच्या दुःखाची मला पूर्ण जाणीव आहे. ती जाणीव ठेवूनच 'भगवंताचे नाम घ्या' असे मी सांगतो. जे मी सुरुवातीला सांगितले तेच शेवटी सांगतो; तुम्ही कसेही असा, पण भगवंताच्या नामाला सोडू नका.

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

मी देही नाही' असे म्हणत राहिलो तर केव्हातरी देहातीत होईन. दुसरा मार्ग म्हणजे 'भगवंत माझा' म्हणावे, म्हणजे देहाचा विसर पडतो. संत सांगतात तो मार्ग चोखाळून पाहावा. गुरू आज्ञा करतो म्हणजे काय करतो ? तर आपले मन जिथे गुंतले असेल तिथून त्याला काढण्याचा तो प्रयत्न करतो. जो शिष्य आज्ञा पाळतो त्याला भेटणे गुरूला भागच पडते. वास्तविक, गुरू मनात काही इच्छाच येऊ देत नाही; म्हणून कामधेनू पेक्षाही गुरू श्रेष्ठ आहे. गुरूने एकदा सांगितले की, 'तुझे मागचे सर्व गेले, पुढे मात्र वाईट वागू नकोस,' तर शिष्याने ते श्रद्धेने खरे मानावे. आपल्या हातून होणाऱ्या चुकांचे परिमार्जन नामच करू शकते. म्हणून गुरूंनी दिलेले नाम सर्व श्रेष्ठ आहे मात्र गुरूने सांगितलाशिवाय जे जे साधन कराल, ते ते फक्त कष्टालाच कारण होईल. 'साधनाची कितीही आटाआटी केली आणि शरीराला कष्ट दिले, तरी ते व्यर्थ जातील. कारण, गुरू व्यतिरिक्त जी खटपट, ती फारशी उपयोगी नसते. गुरूने सांगितलेले साधन हलके मानून आपल्या मनाने केलेले साधन आपल्याला बरे वाटते, क्रमश



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

शतेषु जायते रः सहस्त्रेषु च पण्डितः ।
वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवति वा न वा ।।

सरलार्थ - शंभर माणसांत एखादा सूर निपजतो. हजार माणसांत एखादा पंडित निपजतो. दहा हजार माणसांत एखादा बनता निर्माण होतो; पण दाता होईल की नाही. याची मात्र शंका असते. स्पष्टीकरण यात काय मिळपण सांगायचे आहे. दात्याचा अवध धनाशी असतो; आणि धनलोभ हा मोठा कठीण रोग आहे. माणसाला पैसा हाता- तून सोडवत नाही, असाच सर्वत्र अनुभव येतो. अशा स्थितीत दाता हा दुर्मिळच असायचा. समग्र महाभारतात दानेश्वर म्हणून एकाच पुरुषाचे नाव येते तो आहे कर्ण !

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १६ ऑगस्ट २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# सध्याच्या देशातील परिस्थितीवरून खरंच स्वातंत्र्य उरलं आहे का?

## जितेंद्र आव्हाड : देशात भाजपकडून लोकशाही मिटवण्याचे काम

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतोद तथा नेते जितेंद्र आव्हाड यांनी आज बोलताना म्हणाले आहे की स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी बलिदान दिल्यानंतर स्वातंत्र्य मिळाले आहे. मात्र आज स्वातंत्र्याच्या 77 वा वर्धापन दिन साजरा करत असताना खरंच स्वतंत्र उरलं आहे का? असा प्रश्न सध्या जनतेला पडला आहे. याला सध्या देशांमध्ये आणि महाराष्ट्रात असलेल्या परिस्थिती मुळे असा प्रश्न पडला आहे असे जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी म्हटले आहे.

जितेंद्र आव्हाड पुढे बोलताना म्हणाले की, ज्याप्रमाणे मणिपूर पेटवले गेले त्या ठिकाणी महिलांवर झालेला अत्याचार मात्र तरी देखील स्थानिक सरकार आणि केंद्र सरकार यावर काहीही बोलायला तयार नाही तर दुसरीकडे महाराष्ट्रात देखील अशाच प्रकारे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आज या देशात द्वेषचं राजकारण एवढं मोठ्या प्रमाणात सुरू आहे की माणुसकी उरणार की नाही असा प्रश्न पडला आहे. हे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी आपल्याला आपली लोकशाही



टिकवावी लागेल सध्या सर्वात मोठा हल्ला हा लोकशाहीवर होत आहे. आजच पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे की मी पुन्हा येईल जर लोकशाही टिकवायची असेल तर आपल्याला यांना पुन्हा सत्तेवर येण्यापासून रोखले पाहिजेत तरच लोकशाही टिकवता येईल. महाराष्ट्र कधीही दिल्ली समोरं झुकला नाही आणि झुकणार देखील नाही. जेव्हा केव्हा हिमालय अडचणीत आला त्यावेळी मदतीला सह्याद्री मदतीसाठी धावून गेला आहे. शरद पवार साहेबांनी स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महाराष्ट्राच्या तळागाळात आहे. महाराष्ट्रातील जनता शरद पवार साहेबांच्या पाठीमागे आहे. यात माझ्या मनात कोणतीही शंका नाही आहे. लोकशाहीच्या शत्रूला पराभूत करण्यासाठी आतापासूनच तयारीला लागायला पाहिजे असेही देखील जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी म्हटले आहे. ठाण्यातील कळवा येथे जिल्हा रुग्णालयात आतापर्यंत 27 रुग्ण दगावले आहे. मात्र राज्य सरकार यावर कुठलेही ठोस भूमिका घ्यायला तयार नाही आहे. रुग्णालयातील बेजबाबदार व्यक्तींवर तातडीने कारवाई करण्यात यावी यासंदर्भात आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना म्हटले आहे. मुख्यमंत्री ठाण्याचे असल्याने मी त्यांना ठाण्यातील एक नागरिक या नात्याने विनंती करतो की त्यांनी हलगर्जीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर तातडीने कारवाई करावी असे देखील जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.






# दिल्लीसमोर महाराष्ट्र कधीही झुकणार नाही

## खा. सुप्रियाताई सुळे : देशात दडपशाहीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आज भारताच्या 77 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश कार्यालयात कार्यकारी अध्यक्ष तथा खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आहे यावेळी राष्ट्रीय सरचिटणीस तथा आमदार जितेंद्र आव्हाड, महिला प्रदेश अध्यक्ष विद्याताई चव्हाण मुंबई विभाग कार्याध्यक्ष राखी जाधव यांच्यासह सेवा दलाचे प्रमुख पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रियाताई सुळे मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, भारताच्या जडणघडणीत महाराष्ट्राचे योगदान जास्त आहे. सामाजिक परिवर्तन शैक्षणिक क्षेत्रात असेल ज्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आपण बोलतो त्या शाहू फुले आंबेडकरांचे विचार महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण भारत घेऊन पुढे जात आहे. त्याचा आपल्याला सर्वांना सार्थ अभिमान आहे. मला आज भाषणं करताना वेदना होतं आहे. मणिपूर प्रश्ननी आज प्रचंड दुखः होतं आहे. मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यायला हवा हीच आमच्या पक्षाची मागणी असणार आहे. खासदार सुप्रियाताई सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की लोकांमध्ये द्वेष वाढवण्याच् काम केलं जातं आहे. महागाई बेरोजगारी दिवसेंदिवस वाढत आहे. पेट्रोल डिझेल दर आणखी वाढणार आहेत. याचा जाहीर निषेध करायला हवा. दडपशाही दिन साजरा करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. स्वातंत्र्य दिना च्या दिवशी महागाई, बेरोजगारी, मणिपूर, महिला सुरक्षा यासारख्या आव्हानावर आज बोलावं लागत आहे. यासारखं दुर्दैवची बाब आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर आज मोठी जबाबदारी आली आहे.

यावर सविस्तर बोलताना सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की वॉशिंग मशीनच्या विरोधात आपल्याला लढायचं आहे. हल्ली सगळे



दिड वर्ष झाली महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकत झाल्या नाहीत. निवडणूका घ्या ही मागणी स्वातंत्र्यदिनानिमित्त करावी लागते हे दुर्दैवी आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज भाषण दरम्यान परिवारवर बोलले आहे. प्रत्येक पक्षामध्ये परिवार राहतील व्यक्ती आहेतच मी संसदेमध्ये देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचे भाषण ऐकले होते त्यामध्ये ते म्हटले होते की जर एक बोट दुसऱ्याकडे दाखवले तर तीन बोटे आपल्याकडे असतात असे ते म्हटले होते. जर खरच घराणेशाही बदल करणार असतील तर म्हणजे काय? घराणेशाही म्हणजे जे लोक निवडून आले भाजप मध्ये ही असे लोक आहेत. भ्रष्टाचार बाबत जे आरोप झाले नेत्यांवर जे कधी आरोप झाले भाजपने केले आज ते भाजप मध्ये आहेत. मग संभ्रम काय आहे. भाजप मध्ये याबाबत स्पष्टता नाही. असेही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी यावेळी सांगितले आहे

व्हाट्सअप आणि फेस टाईमवरच बोलतात. याचं कारण नागरिकांना विचारलं तर ते म्हणतात सगळे कॉल रेकॉर्ड होतात. आपण देशाच्या विरोधात कुठलेही काम करत नाही आपण देशासाठी काम करत आहेत त्यामुळे आपण कुणालाही भिण्याचे काम नाही. जे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक जणांनी बलिदान दिले ते स्वातंत्र्य आम्ही कुणाच्याही दडपशाही खाली जाऊ देणार नाही असे देखील खासदार सुप्रियाताई सुळे यांनी म्हटले आहे सर्वसामान्यांचे प्रश्न कुणी सोडवायचे नगरसेवक, ग्रामपंचायत, सदस्य जिल्हा परिषद सदस्य निवडून येतात त्यावेळी सर्वसामान्यांचे प्रश्न प्रशासनासमोर मांडतात. मात्र गेल्या दिड वर्षांपासून सध्याच्या राज्य सरकारने निवडणुका घेतलेल्या नाही आहे या निवडणुका कोणत्या भीतीमुळे घेण्यात आल्या नाही आहे असा प्रश्न देखील यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे यांनी उपस्थित केला आहे. या महाराष्ट्रातील जनतेला कुणाचीही भीती वाटू नये याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच या मायबाप जनतेच्या पाठीमागे उभा राहणार आहे.

प्रसार माध्यमांमध्ये रोज नवीन नवीन संभ्रम समोर येत आहे आज देखील अशा काही बातम्या आल्या आहे. शरद पवार साहेबांची संगोल्याची सभा आणि त्यानंतर पत्रकार परिषद पाहिली तर सध्या निर्माण झालेला संभ्रम पुर्णपणे दूर होईल. आपल्याला कुणाशी वैयक्तीक लढायचं नाहीं आपली वैचारिक लढाई आहे. संभ्रम आपण निर्माण करत नाही आहे तर समोरच्यांच्या मनात संभ्रम असल्यामुळे ते निर्माण करत आहे. अन्याय आणि असत्याच्या विरोधात रस्त्यावर उतरून लढाई लढायची आहे. सध्याच्या राज्यकर्त्यांविरोधात इंडिया आघाडी पूर्णपणे ताकतीने समोर जाणार आहे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीला मोठ्या प्रमाणात यश मिळेल. महाराष्ट्र कधीही दिल्ली समोरं झुकला नाही आणि झुकणार देखील नाही. जेव्हा केव्हा हिमालय अडचणीत आला त्यावेळी मदतीला सह्याद्री मदतीसाठी धावून गेला असे देखील खासदार सुप्रियाताई सुळे यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांनी भूमिका स्पष्ट केली. नात्यांतील ओलावा आणि राजकीय धोरण वेगळे आहे. आमच्या मध्ये कुठल्याही गैरसमज नाही. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँगेस आणि शिवसेनेशी मी स्वतः बोलले त्याची चिंता कोणी करू नये असे देखील खासदार सुप्रियाताई सुळे यांनी म्हटले आहे.

# स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढण्याची तयारी ठेवा : पटोले

## पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून तरी खोटं बोलू नये एवढीच अपेक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशाला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी



मोठा संघर्ष करावा लागला, अनेकांनी बलिदान दिले, त्याग केला. मोठ्या संघर्षानंतर आपल्याला स्वांतत्र्य मिळाले आहे पण ज्या लोकांच्या या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग नव्हता तेच लोक आज सत्तेवर आहेत. या विचारधारेचे लोक दररोज संविधानाची हत्या करत आहेत. आपला राष्ट्रध्वज तिरंगा मानाने डौलत ठेवायचा असून संविधान व लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढण्याची तयारी ठेवा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. काँग्रेस मुख्यालय टिळक भवन येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला, प्रदेशाध्यक्ष पटोले यांनी ध्वजारोहण करून सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले की, देशाचा स्वातंत्र्य दिन साजरा होत असताना पूर्वसंध्येला काही लोकांनी काळा दिवस पाळला, या लोकांची विचारधारा पहा. या लोकांचे स्वातंत्र्य चळवळीत काहीही योगदान नाही.खोटे बोलून सत्तेत आले व मागील ९ वर्षांपासून देशाची संपत्ती विकून देश चालवत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने सर्व सामान्य जनतेला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. त्या संविधानाचा रोज खून केला जात आहे. ब्रिटिश राजवटीत शेतकऱ्यांनाबद्दल जी भाषा वापरली जात असे तीच भाषा आज वापरली जात आहे. जनतेला पुन्हा गुलामगिरीत ढकलण्याचे काम सुरु आहे. बलाढ्य, शक्तीशाली, अत्याचारी ब्रिटिशांना काँग्रेसने देशातून हाकलून लावले आज पुन्हा एकदा तीच परिस्थिती निर्माण झाली आहे, जनतेने सावध रहावे, सजग रहावे.

मणिपूर जळत आहे, त्यावर पंतप्रधानांनी संसदेत शब्द काढला नाही, मणिपूरमध्ये महिलांची नग्न धिंड काढली पण त्यावर चकार शब्द न काढता काँग्रेसवर टीका करत हास्य विनोद करणारा असंवेदनशील पंतप्रधान देशाने पाहिला. भारताला महासत्ता बनवण्याचे काँग्रेसचे स्वप्न आहे आणि हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तयार रहा, असे आवाहन पटोले यांनी केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे माझे मित्र आहेत त्यांनी दोन उपमुख्यमंत्र्यांपासून सावध रहावे असा माझा सल्ला आहे असे नाना पटोले एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले. आजच्या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते व माजी खासदार हुसेन दलवाई, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष व आ. वजाहत मिर्झा, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्या सव्वालाखे, प्रदेश उपाध्यक्ष चारुलता टोकस, सरचिटणीस राजन भोसले, राजेश शर्मा, मुनाफ हकीम, प्रमोद मोरे, देवानंद पवार, जोजो थॉमस, सय्यद झिशान अहमद, श्रीरंग बरगे, सुरेशचंद्र राजहंस, राजाराम देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**लाल किल्ल्यावरून तरी खोटं बोलू नका..**

पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पटोले म्हणाले की, मी पुन्हा लाल किल्ल्यावरून झेंडा फडकवणार अशी भाषा करणारे अहंकारी आहेत. आपल्या देशात नेता मोठा नाही तर देशातील जनता मोठी आहे. कोणाला निवडून आणायचे व कोणाचा पराभव करायचा हा जनतेचा हक्क आहे. बड्या-बड्या नेत्यांचा पराभव जनतेने केला आहे, त्यामुळे ही अहंकारी भाषा अयोग्य आहे. मागील ९ वर्ष सत्तेत असूनही काँग्रेसला शिव्या देण्याशिवाय त्यांनी दुसरे काय काम केले हे सांगावे, असा प्रश्न पटोले यांनी विचारला. आता काँग्रेसला शिव्या देऊन मोदी आपले अपयश लपवू शकणार नाहीत असा टोलाही मारला.

## सूचक विधान

आधुनिक केसरी

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार व सरकारमध्ये सामील झालेल्या गटाचे प्रमुख अजित पवार यांच्या भेटीची जोरदार चर्चा चालू आहे. पुण्यात या दोघांची चोरडिया नावाच्या उद्योगपतीच्या घरी भेट झाली. या भेटीवरून तर्क-वितर्कांना उधाण आले असून यामुळे मविआमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. काँग्रेस व ठाकरे गटाकडूनही यासंदर्भात वेळोवेळी नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. आता काँग्रेसकडून शरद पवारांशिवाय मविआच्या प्लॅन बीवर विचार चालू असल्याचे सांगितले जात आहे. नाना पटोलेंनी यासंदर्भात विचारणा केली असता थेट 'हाय कमांड'कडे बोट दाखवल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. काही दिवसांपूर्वी शरद पवार व अजित पवार यांची पुण्यात एका व्यावसायिकाच्या घरी भेट झाली. यानंतर अजित पवारांनी शरद पवारांना सरकारमध्ये सामील होण्यासाठी विनंती केल्याचेही सांगितले गेले. मात्र, बैठकीत दोघांमध्ये नेमकी काय चर्चा झाली, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर येऊ शकलेली नाही. पण यासंदर्भात काँग्रेस व ठाकरे गटाकडून उघड नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. खुद्द शरद पवारांनी भाजपाबरोबर जाणार नसल्याचे स्पष्ट केले असतानाही तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. आज सकाळी मुंबईतील टिळक भवनात ध्वजारोहणानंतर माध्यमांशी बोलताना सूचक प्रतिक्रिया दिली. शरद पवार व अजित पवारांच्या भेटीगाठींमुळे निर्माण झालेला संभ्रम दूर झाला आहे का? अशी विचारणा केली असता नाना पटोलेंनी त्यावर हाय कमांड अर्थात सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे व काँग्रेसमधील इतर वरीष्ठ नेते निर्णय घेतील असे सांगितले आहे. आमचे हाय कमांड आता यावर निर्णय घेईल. यावर आम्ही कोणता निर्णय घेण्याचं काही कारण नाही, असे ते म्हणाले. शरद पवारांच्या भेटी आमच्यासाठी चिंतेचा विषय आहेच. अशा लपून होणाऱ्या भेटीगाठी बरोबर नाहीत. पण ही सगळी चर्चा उच्च पातळीवर होईल. इंडिया आघाडीच्या पातळीवर होईल. मी यावर काही बोलणे योग्य नाही, असे नाना पटोले म्हणाले. कुठल्या पक्षात काय चालले हा आमचा विषय नाहीये. त्या गटाचे प्रमुख म्हणून शरद पवार काय भूमिका घेतात तो त्यांचा प्रश्न आहे. त्यांच्यावर कुणी जबरदस्ती करण्याचं काही कारण नाही. काँग्रेसची भूमिका स्पष्ट आहे. जो कुणी भाजपाविरोधात लढायला तयार असेल, त्याला आम्ही सोबत घेऊन चालू ही आमची भूमिका आहे असे नाना पटोलेंनी यावेळी बोलताना नमूद केले.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

## ध्वज अवमाननेत सरकारच दोषी!

आधुनिक केसरी

**भारत देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात भारतभूमचा सार्थ अभिमान असावयास हवाच. देशाचा तिरंगा राष्ट्रध्वज उच्चस्थानी फडकत बघून आदराने मान वाकवून ध्वजवंदन करायलाच पाहिजे. हाच खरा देशप्रेमाचा, राष्ट्रभक्तीचा आणि राष्ट्रध्वज सन्मानाचा उत्तम दाखला ठरतो. मागील सन २०२२पासून संपूर्ण विश्वात भारतातील जनतेचे देशावरचे प्रेम व राष्ट्रीय ऐक्य दाखवून देण्याच्या महत्वाकांक्षेने केंद्र सरकारने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अभियानांतर्गत घरोघरी तिरंगा हा उपक्रम आयोजित केला आहे. हा निर्णय तसा देशाची आण, बाण, शान तथा मान उंचावण्याच्या उद्देशाने चांगला आहे. संपूर्ण भारतदेश तीन रंगाने शोभून जगावेगळा दृष्टीस पडत आहे, येथवर ठिक आहे.**

मात्र तेवढाच जनतेला राजद्रोही व देशद्रोही ठरविणाराही सिद्ध होत आहे आणि पुढेही होईलच, यात तिळमात्र शंका नाही. रोज रोटीतुकडा मागून पोटभरणाऱ्या काही लोकांना आजही राहण्यास घरे नाहीत, त्यांनी राष्ट्रध्वज उभारावीत तरी कोठे? उभारली नाहीत; म्हणून त्यांना सरकारने का राष्ट्रद्रोही ठरवावे? काही लोकांनी तिरंगा फडकविला, पुढेही फडकावतीलही, मात्र त्यांना कुठे माहित पडतं, की आपण ध्वज उलटं लावलं की सुलटं? उपक्रमाची यशस्वी सांगता झाल्यानंतर प्रत्येक घरातील ध्वज ठेवलं गेलं कुठं? पुढेही ठेवलं जावं कुठं? त्याची व्यवस्था योग्यरीत्या लावली गेली का? पुढेही लावली जाईल का? पूर्वी शौकीन व अतिव देशाभिमानी लोक मुलांच्या हातात प्लास्टिकचे ध्वज देत व नंतर दुसऱ्या दिवशी ते कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर कचरा म्हणून फेकली जात. काही ठिकाणी तसलेच चित्र दिसल्याचे समाज माध्यमांनी जगासमोर मांडले होते. अगदी तसलीच गत पुढेही होतच राहणार तर नाही ना? अशा अनेक समस्या राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यात उद्‌भवत आहेत, पुढेही उद्‌भवणार आहेतच.

याच चुकांना गृहीत धरून संबंधित लोकांवर राष्ट्रध्वजाचा अवमान करणारे म्हणून गुन्हे दाखल करून त्यांना तुरूंगात डांबले गेले आणि पुढेही जाईल. याचा कोणीतरी तज्ज्ञांनी सांगोपांग विचार का केला नाही? आतातरी विचार केला जावा. मागील वर्षी अनेक किस्से उजेडात आले. राष्ट्रध्वज पुरविणारांनी ते कसेही अयोग्य ध्वज पुरविले. त्यात ते वाकडेतिकडे शिवलेले, फाटलेले, स्वप्रसिद्धीस्तव आपले नाव लिहिलेले, सही केलेले, दुसऱ्याच देशाचे चिन्ह लावलेले, अशा कितीतरी उणिवा किंवा भर घातलेले ध्वज होते. गडचिरोली नगरपरिषद तर्फे गडचिरोली शहरभर घरोघरी जाऊन ध्वज वाटले गेले. माझ्याकडेही ते घेऊन आले. मी ध्वज तपासून पाहिले, तेव्हा त्यात एकही ध्वज योग्य नव्हता. त्यात तिरंगी पट्ट्या असमांतर होत्या आणि अशोकचक्र केंद्रस्थानी नव्हते, तर ते कोणत्यातरी एका दिशेला अधिक सरकलेले दिसत होते; म्हणून मी एकही ध्वज पसंत करून घेतला नाही. त्या कर्मचाऱ्यांना मी फर्मावत म्हटले, कि मी असा ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाची बेईज्जती करू इच्छित नाही, त्यापेक्षा मी ध्वज न फडकावण्याच्या गुन्ह्याला सामोरे जाण्यास तयार असेन. ज्यांनी असा माझ्यासारखा विचार केला असेल ते माझ्या मते खरेच भारताचे सूज्ञ नागरिक होत. जे घरी ध्वजारोहण करू इच्छित नाही. या शुद्ध सात्विक विचाराने घरी तिरंगा न फडकावणाऱ्यांना राजद्रोही व देशद्रोही ठरविले जाऊ शकते का? घरोघरी ऐवजी चौका चौकात, मोहल्या मोहल्यात, टोल्या पाड्यात, गल्लोगल्ली किंवा गावोगावी यापैकी कोणताही पर्याय योग्य ठरला असता. कारण त्यामध्ये सामूहिक जबाबदारी राहिली असती. यासाठी सरकारने घरोघरी तिरंगा अभियानाच्या यशस्वितेसाठी पूर्वतयारी म्हणून गाव, वॉर्ड, नगर, शहर अशा प्रत्येक स्तरावर प्रशिक्षणाद्वारे ध्वजसंहिता आणि ध्वज फडकविण्याचे, हाताळण्याचे, निगा राखण्याचे नियम प्रत्येक नागरिकास अवगत करून देण्यात यावेत. घरोघरी यातील वैयक्तिक जबाबदारी राष्ट्रध्वज हाताळण्याविषयीच्या पुढील नियमांनुसार पार पाडणे खरेच अवघड आहे हो!

शासनमान्य नियमः ध्वज फडकावताना तो फाटलेला, मळलेला किंवा चुरगळलेला नसावा. तिरंगा व्यवस्थित ठिकाणी फडकवावा. ज्या उंचीवर तो फडकविला आहे, त्याच्या बरोबरीच्या उंचीवर इतर कोणताही ध्वज नसावा. कोणत्याही प्रकारच्या सजावटीत राष्ट्रध्वजाचा वापर करू नये. ध्वजारोहणासाठी झेंडा तयार करताना त्यात फुलं ठेवता येतील. ध्वज फडकविताना नारिंगी रंग वरच्या बाजूला राहील, याची दक्षता घ्यावी. ध्वजावर काहीही लिहू नये. कोणतीही वस्तू झाकण्यासाठी त्याचा वापर करू नये. राष्ट्रध्वज फरशीवर पडलेला नसावा, पाण्यावर तरंगलेला नसावा. जेव्हा ध्वज फडकावतो तेव्हा तो ध्वजस्तंभाच्या उजव्या बाजूला असावा.

**"एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार,**
**गर्जा जय जयकार क्रांतीचा गर्जा जय जयकार!"**

कवी कुसुमाग्रजांनी केलेल्या या आवाहनाचे सार्थक होण्यास दि.१५ ऑगस्ट १९४७चा दिवस उजाडला. पक्षी पिंजऱ्यातून उडाला. स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्या बलिदानांचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता-बघता स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षांचा होता आहे. आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनात ७५ वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी, राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्वाचे आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या? आज सत्य काय आहे? कुठे होतो आपण आणि आता कुठे आहोत? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील? याचा विचार आपल्यालाच करावा लागेल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपण काय कमावलं? आणि काय गमावलं? याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची भूमी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्षे साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रामध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावंतांनी आपला अमीट ठसा उमटवला आहे.

पण असे असले तरी एकीकडे प्रगती होत आहे आणि दुसरीकडे अनेक गोष्टी आपल्याला वेदना देत आहेत. स्वातंत्र्यासाठी अनेक शूरवीरांनी ऐन तारुण्यात बलिदान दिले. आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी समर्पित केले, स्वरक्ताचा सडा टाकला. परंतु आम्ही मात्र रक्ताचा घाऊक बाजार मांडला आहे, असं कधीकधी उगीचंच वाटते. त्या देशभक्तांनी राष्ट्रध्वजास प्राणाहून प्रिय मानले व तसे वागविलेही. ते साधे जमिनीवरही पडू दिले नाही. मात्र आम्ही ते पायदळी तुडवून देशाची शान उंचावित असल्याच्या आविर्भावात वागत आहोत, हीच खरी मोठ्या शरमेची गोष्ट नाही का?आज चीन-पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशांमध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामासारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपल्याला दुःख देतात. या देशातल्या शेतकऱ्याला आपल्या हक्कांसाठी आंदोलन करावे लागते. अनेक गरिबांना एक वेळचे जेवणसुद्धा मिळत नाही. स्वर्गासारखा काश्मीर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत रहाण्याऐवजी रक्तात रंगताना पाहायला मिळतो. धर्माच्या नावावरून जातीय दंगली होतात, तेव्हा स्वातंत्र्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात.

भारत मातेच्या हृदयाचे शेकडों तुकडे होतात. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील, तर त्या आईची काय अवस्था होत असेल? या साऱ्या आक्रमणांमध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो. जळणारी झोपडी आणि करपणारे रक्त मात्र भारतीयच आहे, हे आपण का विसरतो? हा खरा प्रश्न आहे. भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे मोठी व्यवस्था पोखरली जाते. रीज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते, तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे, तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. तुरूंगात असताना अनेक गुन्हेगार निवडणुका जिंकतात. दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी गिळंकृत करणारी मंडळी या देशाचे मारेकरी आहेत. सत्यमेव जयते! हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे. परंतु अशा दृष्ट प्रवृत्तींमुळे देश शोकग्रस्त होतो. कधीकधी देशासाठी फासावर चढणारे तरुण, अवघ्या चौदाव्या वर्षी शरीरावर गोळी बार झेलणारे शिरीष कुमारसारखे तरुण पाहिले तर आजच्या या तरुण पिढीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना कधी कळेल का? असा प्रश्न पडतो.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपल्याला एक गोष्ट मान्यच करावी लागेल, की भारतीय स्वातंत्र्याने आपल्याला खुप काही दिले आहे. परंतु जो असमाधानाचा, असंतोषाचा सूर आणि धूर निघत आहे, त्याला आपणच जबाबदार आहोत. आपली आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झाली. पण... पण मूल्यांचा ऱ्हास होत गेला. म्हणूनच एकीकडे आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करीत आहोत. परंतु त्याचवेळी दुसऱ्या बाजूने वेगाने वाढणाऱ्या भौतिक व अभौतिक समस्यांच्या दृष्ट विळख्यात आपण अडकल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय. अशीच अवस्था पुढेही होऊ नये, म्हणूनच स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षानिमित राबविण्यात येणाऱ्या अभियानात सूज्ञ नागरिक बनून सावधपणे पावले टाकावीत. घरोघरी तिरंगा प्रत्येकानी उभारला पाहिजे, मात्र तत्पूर्वी त्या देशभक्ताने राष्ट्रध्वज संहिता व नियम आत्मसात केले पाहिजे. कारण तिरंगा हाताळणे माझ्यासारख्या ऐऱ्यागैऱ्याचे काम नाहीच!



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

## तिरंगा भारतमातेची 'आन-बाण-शान'

आधुनिक केसरी

**शहिदांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत व्हाव्यात व नवीन पिढीला शहिदांची,क्रांतिकारकांची,थोर महात्म्यांची आणि पुर्वजांची आठवण निरंतर रहावी व इतिहास जागृत रहावा याद्दष्टीकोणातुन 15 ऑगस्टला प्रत्येक घरावर तिरंगा फडकवुन देशाची आन-बाण-शान उंचावण्यासाठी सर्वांनीच अग्रेसर रहायला हवे.कारण तिरंगा भारतासाठी व भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी अनमोल रत्न आहे. कारण यातुनच क्रांतीची मशाल उदयास आली व 15 ऑगस्ट 1947 हा दिवस उजाडला.**

यात सुर्याचा प्रखर तेजोमय प्रकाश, चंद्राची शांतीमय प्रतीमा, लखलखत्या ताऱ्यांचे प्रकाशमय वातावरण निर्माण करणे आणि वायू देवतेच्या सहवासाने विराजमान होवून देशाच्या शुरवीरांना व क्रांतिकारकांना तिरंगा सांगतो की "मेरा देश महान" त्यामुळे महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यांनी 15 ऑगस्टला तिरंग्या सोबतच वृक्ष लावण्याचा निर्धार करावा. यामुळे स्वतंत्रता दिवस अनंत काळापर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहील व संपूर्ण भारतात आपल्याला हिरवागार गालिचा सर्वीकडेच दिसून येईल. 15 ऑगस्टचे स्वागत करण्यासाठी आपल्याला संपूर्ण नद्यांचा खळखळाट ऐकु येईल, समुद्र देवता आपल्या लाटांच्या खुशीने स्वागत करेल अशा प्रकारे स्थल,जल,वायु देवता 15 ऑगस्टच्या स्वागतासाठी सज्ज आहे.देशातील वाढते प्रदुषण व दिवसेंदिवस कमी होत असलेले ऑक्सिजनचे प्रमाण यामुळे पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतु भयभीत आहे. याकरीता स्वतंत्र दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यांनी 15 ऑगस्टला एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने झाडे लावण्याचा संकल्प करावा. या वृक्षलागवडीमुळे देशातील वातावरण प्रफुल्लित होईल व आपले पुर्वज आशिर्वाद देतील आणि त्यांना अभिमान होईल की स्वतंत्र भारतात सर्वकाही ठीक आहे. वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळेण्यास मोठी मदत होईल. आपल्या पुर्वजांनी अनेक कठीण प्रसंगांशी सामना करत 1947 ला देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यानिमित्त्याने देशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.त्या अनुषंगाने संपूर्ण भारतात जय्यत तयारी झाली आहे ही अत्यंत आनंदाची व स्वागतार्ह बाब आहे. देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक थोर महात्मे, क्रांतिकारक, जहालवादी नेते,मवाळवादी नेते यांच्या एकसुत्री कार्यक्रमाने व बलीदानानेच 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेतो आहे. त्याकाळी स्वातंत्र्यासाठी घरा-घरातुन आवाज बुलंद व्हायचा व स्वातंत्र्यासाठी संघर्षमय वातावरण निर्माण करून संपूर्ण युवावर्ग इंग्रजांशी लोहा घेण्यासाठी काहीही करायला तयार रहायचे. आज आपल्याला आपल्या क्रांतिकारकांचे, शहिदांचे, थोरमहात्म्यांचे अनुकरण करून त्यांनी मिळवुन दिलेल्या स्वातंत्र्याची आठवण म्हणून प्रत्येकांनी 15 ऑगस्टला आप आपल्या घरावर तिरंगा फडकवीलाच पाहिजे असा प्रण देशाच्या 139 कोटी जनतेनी घेतला पाहिजे.असे जर झाले तर तिरंगा एवढ्या उंचावर गेलेला आपल्याला दिसेल की संपूर्ण जग आश्चर्य चकित होईल व म्हणतील खरोखरच भारत देश महान.कारण आज भारत विश्व गुरू आहे सोबतच जागतिक पातळीवर शांतीचे प्रतीक म्हणून जगात भारताची ओळख आहे. कारण जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी अनेक धर्माचे, पंथाचे,जातीचे लोक एकोप्याने रहातात. जेव्हा -देशाच्या एकतेचा आणि अखंडतेचा प्रश्न येतो तेंव्हा -तेव्हा सर्वच एकनिष्ठेने कार्य करतात. त्यामुळे आपआपल्या घरावर तिरंगा फडकवुन जगाला आपली ऐकता व अखंडता अवश्य दाखविली पाहिजे. कारण भारतातील छोटे-मोठे सर्वच जाणतात की देश स्वतंत्र करण्यासाठी शुरविरांना, क्रांतिकारकांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या, बलिदान द्यावे लागले,फासावर जावे लागले तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.आपण शुरविरांना, क्रांतिकारकांना, थोरमहात्म्यांना सुईच्या टोकायेवढीही मदत करू शकत नाही. परंतु 15 ऑगस्टला प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन आपल्या पुर्वजाच्या आठवणी ताज्या अवश्य करू शकतो. आजही प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यात आपल्या पुर्वजांच्या आठवणी आहेत व स्वाभिमान आहे यात दुमत नाही. कारण जोपर्यंत सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत भारत भुमितील प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्यवीरांना, शहिदांना, क्रांतिकारकांना आपल्या काळजात ठेवून स्मरणात ठेवतीलच. आपले पुर्वज आपल्याला कुठुनतरी अवश्य पहात असेलच त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन शहिदांना स्मरण केलेच पाहिजे व याच दिवसाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन वाढत्या प्रदूषणावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज देशाची स्थल सेना, वायुसेना, नौसेना तिरंग्याचा स्वाभिमान अबाध्य रहावा यासाठी अहोरात्र देशाच्या सुरक्षेसाठी तत्पर दिसून येतात. त्यामुळे तिरंगा देशातील सिमावर्ती भागातील सैनिकांसाठी भारतमातेचा आत्मा आहे. शहिदांना, क्रांतिकारकांना, थोर महात्म्यांना माझा कोटी कोटी प्रणाम! जय हिंद! वंदे मातरम्! भारत माता की जय!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पक्ष बळकटीसाठी प्रयत्न करूया : प्रफुल पटेल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकांनी आपल्यावर ठेवलेल्या विश्वासाला खरे उतरुन पक्षाचे नेते अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आपला पक्ष अधिक बळकट कसा करता येईल यासाठी प्रयत्न करूया, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांनी आज केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पक्षाच्यावतीने त्यांनी सर्व देशवासीयांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. आपला देश प्रगतीपथावर चालत राहण्यासाठी देशामधील सामान्य शेतकरी, दलित, आदिवासी, कामगार, युवा, महिला अशा सर्व घटकांचा समावेश असावा असे मत प्रफुल पटेल यांनी व्यक्त केले. आपण मिळून राज्याची आणि देशाची उत्तमरीत्या सेवा करूया. लोकांची आपल्या पक्षाकडून असलेली अपेक्षा यशस्वीपणे पूर्ण करण्याचा संकल्प करूया. आदरणीय शरद पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली १९९९ साली आपल्या पक्षाची स्थापना करताना आपण जो संकल्प केला होता त्याप्रमाणे अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची उन्नती सतत होत राहिली. आजचा दिवस हा देशासोबतच आपल्या पक्षासाठीही शुभ दिवस आहे. राज्याची सेवा करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. राज्यकर्त्यांना केवळ सत्तेसाठी संधी मिळत नाही तर खऱ्या अर्थाने आपले विचार आणि आचारांनी लोकांच्या सेवेची आणि विकासाची जबाबदारी मिळते, ती जनसेवेत अर्पित करण्याचा प्रयत्न करूया असेही प्रफुल पटेल यांनी स्पष्ट केले.

**प्रत्येक कार्यकर्त्याचे देशाच्या प्रगतीमध्ये उल्लेखनीय योगदान राहिल : सुनिल तटकरे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला संविधान, धर्मनिरपेक्ष विचार दिले. यातून देशाची संसदीय लोकशाही प्रणाली व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे काम आपण प्रत्येकाने मिळून करायला हवे. आपल्या पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याचे देशाच्या प्रगतीमध्ये उल्लेखनीय योगदान राहिल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला.
देशातील संसदीय लोकशाही प्रणाली, एकात्मता, अखंडता, देशाची जलद गतीने विकसित होण्याची प्रक्रिया अव्याहतपणे सुरु ठेवणे हे २१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकातील आपल्या सर्वांचे कर्तव्य ठरते. देशाच्या अमृतमहोत्सवाचा देशवासियांमध्ये प्रचंड उत्साह आहे. प्रत्येक भारतीयाने देशाप्रतीच्या आपल्या योगदानातून देशाचे भवितव्य जगाच्या पाठीवर अधोरेखित करण्याचे काम करावे, असे आवाहनही सुनिल तटकरे यांनी केले.

# जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथे दि 14 ऑगस्ट 2023 रोजी कृषि विज्ञान केंद्र, पैठण रोड, औरंगाबाद येथे जिल्हा रानभाजी महोत्सव कार्यक्रमाच संपन्न झाला कार्यक्रमाचे उदघाटन संदीपानजी भुमरे पालकमंत्री तथा रो.ह.यो. फलोत्पादन मंत्री यांच्या शुभ हस्ते झाले. कार्यक्रमाचे सुरवातीला प्रकल्प संचालक आत्मा औरंगाबाद बी.एस.तौर यांनी प्रास्ताविक करताना रानभाजी लोकांनी भरभरून प्रतिसाद देण्याची अपेक्षा व्यक्त करताना रानभाजी आरोग्यास उपयुक्त असल्याचे नमूद केले. त्यानंतर कृषि विज्ञान केंद्राचे डॉ. किशोर झाडे यांनी वेगवेगळ्या रानभाजी आणि त्यांचे आहारातील महत्व विशद केले लोकांना औषधाला पर्याय म्हणून रानभाजी वापरण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागीय कृषि सहसंचालक आर.टी. जाधव यांनी या कार्यक्रमाचे कौतुक करताना सातत्य राखण्याचे आवाहन केले यावेळी रानभाजी महोत्सवात वेगवेगळ्या भाज्या चे स्टोल लावण्यात आले होते. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री.पी.आर.देशमुख यांनी आज जागतीक अदीवासी दिना निमित्त रानभाज्याचे महत्व या बाबत माहिती दिली. विविध रानभज्याचे आरोग्यासाठी महत्व त्यांनी सांगीतले. सराटा, उंबर, शंकरसुर, फांदयाचा भाजी, कपाळ फाडी, तरवट, कडवंची ,शेवग्याचे पाने, अंबाडी, राजगिरा ,अळू, पाथरी, टाकला, केना ,हदगा ,गुळवेल, भुई, आवळा ,तांदुळसा , पिंपळ रान तुळस, करटुले, आघाडा , घोळ, अंबटचुका , अश्या विविध भाज्यांचा समावेश होता ग्राहकांनी या भाज्या खरेदीस प्राधान्य दिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रकल्प उपसंचालक आत्मा श्री. अनिल कुलकर्णी यांनी केले. महोत्सवात सहभाग घेतलेले शेतकरी, शेतकरी गट यांना प्रमाणपत्र देवुन गौरविन्यात आले. सदर कार्यक्रमासाठी विभागीय कृषि सहसंचालक आर.टी. जाधव, प्रकल्प संचालक आत्मा बी.एस.तौर, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री पी आर देशमुख , कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ किशोर झाडे, आत्मा चे प्रकल्प उपसंचालक अनिल कुलकर्णी, धनश्री जाधव, श्रीमत जगताप मॅडम,तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया , सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आत्मा चे कर्मचारी बी टी एम, ए टी एम, सी. पी. यांनी मेहनत घेतली शेतकऱ्यांना वेगवेगळ्या तालुक्यातून आणून हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.



# अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रध्वजाचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वैजपूर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि छायाचित्रकार शांताराम मगर यांच्याकडुन हर घर तिरंगा अंतर्गत घरोघरी तिरंगा मेहिमेअंतर्गत व स्वतंत्र भारताच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताच्या राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व छायाचित्रकार शांताराम मगर यांनी भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात सर्वत्र 'आजादी का अमृत महोत्सव' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे. या निमित्ताने हर घर तिरंगा अंतर्गत दि.13 ते 15 ऑगस्ट दिवशी देशातील प्रत्येक घरांवर तिरंगा ध्वज फडकवला जाणार आहे. आपला राष्ट्रध्वज तिरंगा आपला अभिमान अस्मिता आहे. त्यामुळे झेंड्याचा कुठल्याही प्रकारे अनादर होवू नये,आशेवर शांताराम मगर यांनी सांगितले. घरोघरी तिरंगा ध्वज लावण्याचे आव्हान केले.

# स्वातंत्र्यदिनी भोळीच्या शाळेस २० महापुरुषांच्या प्रतिमा भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** विद्यार्थ्यांना महापुरुषांचे कार्य समजण्यासाठी शालेय स्तरांवर विशेष प्रयत्न केले जात असतात. जयंती आणि पुण्यतिथीच्या निमित्ताने प्रतिमा पूजनाने महापुरुषांना अभिवादन करत त्यांच्या कार्याचे स्मरण, विद्यार्थ्यांना माहिती देत केले जात असते. महापुरुष हे विद्यार्थ्यांना समजून सांगणे शिक्षकांची जबाबदारी तर आहेच परंतु गावचे ग्रामस्थ म्हणून काही नागरिकसुद्धा जबाबदारी पेलताना दिसत असतात. शाळांना शालेय साहित्य भेट देणारे अनेक उपक्रम सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटना, दानशूर लोकं शाळेत घेत असतात. हे शैक्षणिक कार्य खूप अनमोल असे आहे. त्याच बरोबर शाळांना महापुरुषांच्या प्रतिम भेट देणे हे ही खूप महत्वाचे आहे. हेच महत्व ओळखून स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून भोळी, ता.खंडाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महापुरुषांच्या प्रतिमा भेट देण्याचे महत्वपूर्ण कार्य सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेले आहे. शरद महादेव खुंटे असे सामाजिक कार्यकर्त्याचे नांव असून त्यांनी एकूण २० महापुरुषांच्या प्रतिमा शाळेस भेट दिल्या. भोळीची ही जिल्हा परिषद शाळा खूप जुनी शाळा असून शाळेच्या आवश्यकतेनुसारमहापुरुषांच्या प्रतिमांची गरज समजून घेऊन शरद खुंटे यांनी शाळेस पूर्वी ६ प्रतिमा आणि स्वातंत्र्य दिनी एकूण १४ प्रतिमा देण्याचे कार्य केले. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्याबाई होळकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लाल बहादूर शास्त्री, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, यशवंतराव चव्हाण, डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम आदी महापुरुषांच्या प्रतिमा शाळेस दिलेल्या आहेत.



या भेटी बद्दल शरद खुंटे यांचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच शाळेने याबद्दल आभार ही मानले. यावेळी भोळी गावचे सरपंच प्रशांत खुंटे, डॉ.विजय खुंटे, माजी सरपंच अजिंक्य चव्हाण, माजी सरपंच हेमंत चव्हाण, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनंत चव्हाण, मुख्याध्यापक मनोज रायगुडे, न्यू इंग्लिशचे प्राचार्य बोबडे, भरत चव्हाण, संतोष नेवसे, स्वाती मोहिते, विश्वास चव्हाण, अनिकेत चौधरी, युवराज खुंटे आदी उपस्थित होते. महापुरुषांचे देशासाठी दिलेले योगदान खूप मोठे आहे. सर्व मुलामुलींना महापुरुषांच्या कार्याची व बलिदानाची ओळख होणे गरजेचे आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७६ वर्ष पूर्ण झालेली आहेत. आज आपण त्या सर्व महापुरुषांच्या योगदाना मुळे आज आपला भारत हा सुजलाम सुफलाम दिसत आहे. याची जाणीव ठेवूनच आपण काम केले पाहिजे, असे शरद खुंटे यांनी म्हटले आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती
मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बॅंक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क -
9822982958

CAFÉ ROCKSTARZ
EAT . CHILL . REPEAT
11:11
ELEVEN ELEVEN
Where Dishes come true..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# बैलपोळा



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**परवा सहज बाजारात गेले होते, बाजारात बऱ्याच ठिकाणी सुंदर सुंदर बैल जोडी पहिल्या. आषाढी एकादशी झाली, एवढ्यातच बेंदुर आला असेल, शिवाय एक जुलै महाराष्ट्र कृषी दिन मनात विचार येऊन गेला. मुळाचा सण बेंदूर सणापासून सणांना सुरुवात होत असल्यामुळे मुळाचा सण. आकीती, सणाची निचिती, अन बेंदूर सणांचा लेंडुर अशी वयोवृद्ध माणसे म्हणायची. पण... आज बेंदूर आला असेल, असं आपल्याला म्हणावे लागते. याच आश्चर्य वाटलं. नि मनात आले, गेले ते दिवस राहिल्या त्या अनामिक सावल्या दूरवर. .खूप दूरवर हरवलेल्या, पण खरं सांगायचं तर अशा आवसं पूनव (अमावस्या पौर्णिमा) सारख्या येतात ना तेंव्हा का व्या पापण्यांवर शुभ्र मोत्यात सारा जीवन पट उलगडून दाखवतात. नी मग ओघळता ओघळता नवी ऊर्जा देऊन जातात. किती छान आयुष्य होत ते, म्हणजे आताही आहे.**

पण.. निसर्गाच्या सानिध्यात कौलारु विटा मातीच्या घरात गुण्यागोविंदाने एकत्र नांदणारे प्रेम, माया, ममता अंगणातल्या तुळशीतील निरांजनाची चांदण्यात पडलेली ती सावट, मागल दारच्या बाभळी मागचा चंद्र वळचणीला धरलेले हात, शाळेत जाताना घेतलेली पोत्याची खोळं, बी बिवडं आर कुठल बियान आणल. 'महाबीजच' 'युरिया सल्फेट वगैरे वगैरे कोवळया कोवळया तृणाने फुललेले शिवार आणि शिवारात जिकडे तिकडे बैलांच्या घुंगरांचा अन् अ... सर्जा य.. अ..संज्या..ऐ आवाजानी घुमलेल ते शिवार आज पहायला मिळत नाही, अस नाही. पण खूप कमी पहायला मिळते.शेती आजही आहे तिथेच आहे.पण त्याच्यातला तो गावरानं गोडवा हरवला आहे. असं मला वाटतं असो काळाबरोबर चालणे हिच काळाची गरज आहे. असो! आज खूप दिवसानी आठवलं त्याच बळीराजाची साथ देणाऱ्या बैलाची कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक सण म्हणजे बैलपोळा. मला आजही आठवतेय. बैलपोळ्याच्या अगोदर काही दिवस अगोदरच शेतातील पेरणी झालेली असायची. अर्थात कधी मागे पुढेही व्हायची.पावसाच्या आगमनावर अवलंबून असायची. आषाढाची रिपरिप चालू असायची.ओढे नदी नाले भरुन वाहत असायचे. थकलेल्या शरीराला अन् मनाला नव्याने उभारी देत बैलपोळा सण यायचा. एक दोन दिवस आधी शेतातील माती आणून त्या मातीपासून छोटे छोटे मातीचे बैल तयार करताना जो आनंद मिळायचा तो आनंद आज हरवून गेला आहे. त्या मातीसाठी चिखलात रुतलेले पाय आज ...ठीक आहे, बैलपोळ्याच्या आदल्या दिवशी ते छोटे छोटे बैल पाटावर मांडून ठेवायचे.
इकडे गोठ्यातील बैलाना नदी ओढ्यावरुन धुवून स्वच्छ करुन घरी आणून प्रेमाने त्याला गरम पाण्याने ही आंघोळ घातली जायची. सायंकाळच्या वेळी हळद आणि गोडेतेल गरम करुन त्याची आणि ज्याच्यांकडे बैल नाहीत त्यानी घरातील मातीच्या बैलांची खांदे अर्थात वशिंड बैलाच्या पाठीवरचा उंच भाग म्हणजे वशिंड त्या भागाची तेल आणि हळदीने मालिश अर्थात खांदे मळणी करायची. शिंगामध्ये कडबोळी ( गहू नि हरभरा डाळीच्या पीठाचा एक गोलाकार गोड पदार्थ ) घालायची. संध्याकाळी बाजरीच्या कण्या घुगऱ्यांचा नैवेद्य द्यायचा. दुसऱ्या दिवशी रंगाचा हिंगळाचा डबा आणून शिंगाना रंग लावायचा. बेगड पट्ट्या अंगावर रंगबिरंगी रंगानी लाकडी छापानी वेगवेगळे रंगाचे छाप उठावयचे. आता कधी कधी काही प्रेरणादायी वाक्ये लिहतात. जसे 'झाडे लावा झाडे जगवा.' असे कपाळावर रंगीत बाशिंग शिंगात पितळेच्या गोंड्याच्या शेंब्या,घुंगरु चाळ, रंगीत मण्यांची माळ, पितळी तोडे,घुंगराचे चाळ , कवड्याची माळ, म्होरकी, वेसन, गुढग्याचे गंडे,शिंगदोर पितळेचे तोडे, रंगीत कासरा, अंगावर टाकण्यासाठी झूल , रंगीबिरंगी रिबीन, कंबरपट्टा पायांचा पट्टा, तसेच वाकाचे गोंडे गळ्यात घातले जायचे. घातले जायचे, करायचे, ठेवायचे, हे एवढ्याच साठी आता या वस्तू काळाच्या ओघात मागे पडत गेल्या आहेत. इत्यादी वस्तूनी बैलाची सजावट करायची. वरील शब्द प्रयोग यासाठी की जूनं जे मुजत चालले आहे.त्यासाठी छोटासा प्रयत्न.
बैलपोळाच्या दिवशी पुरणपोळीचा स्वयंपाक




करायचा. त्यावेळी प्रत्येक शेताला वाड्या द्यावयाच्या. वाड्या म्हणजे पुरणपोळीचा छोटा नैवेद्य , शेतात घेवून जायचे. प्रत्येक शेताला नैवेद्य द्यायचा.पीक पाहणी करणे हे त्यामागचे कारण असावे बहुदा. किती विचारपूर्वक आपल्या सणांच्या काही रुढी परंपरा आहेत.म्हणजे त्याला काही तरी पूरक अशी कारण आहे.घराघराला आंब्याचे तोरण लावावयाचे. शेताला नैवेद्य देवून आल्यानंतर चौकात घराघरच्या बैलांच्या रांगा लावायच्या. घरच्या घर धनी नी बैल देवाला जायच्या अगोदर त्यांची पूजा करायची. आणि वाजत गाजत गावातून मिरवणूक काढायची.देवळात जावून देवाच्या सभोवताली फिरून येऊन देवळातील अंगारा लावयचा. यावरुन शेतकऱ्याच्या पशुधनाच्या बाबतीतली कृतज्ञता दिसून येते.मिरवणूक काढताना बैलाना छत्रीने बुजवणाऱ्या ची काही कमी नसायची. तेव्हा खूप राग ही यायचा.पण मोठी माणसे समजून सांगायची असू दे काही नाही होत.नि मग बर हि वाटायचं.
घरी आल्यानंतर घरातील गृहिणी त्याची घास मुटका टाकून त्याची दृष्ट काढायची.
अशा पद्धतीने बैलपोळा सण साजरा व्हायचा. त्याच्या कृतज्ञतेची भावनेचे एक उदाहरण म्हणजे काही शेतकरी बैलाला मंदिरातून आणल्याशिवाय अन्नचा घास ही मोडत नाहीत. त्यावेळी वाटते हे फक्त एक शेतकरीच करू शकतो.
अलिकडे बैलपोळ्याला बैलाऐवजी गावातून ट्रॅक्टरची हि मिरवणूक काढली जाते.हे पाहिल्यानंतर मन उद्विग्न होते. आधुनिकीकरण हवे आहेच. पण वाढत्या आधुनिकी करणात काही पारंपारीक गोष्टी मागे पडत चालल्या आहेत.आणि हे पाहिल्यानंतर म्हणजे शेती करायची कशी, कोणी, त्यामागची अनेक कारणे आहेत. हा खूप मोठा प्रश्न आहे. अर्थात त्याला निसर्गाची आजूबाजूच्या वातावरणाची साथ हि हवीच. माफ करा कोणाच्या भावना दुखावयच्या नाहीत. पण कधीतरी एखादी गोष्ट मनाला स्पर्शून जाते.
आणि एवढ्या या साऱ्या अडिअडचणीत हि आपले पाय त्या मातीत घट्ट रोवून राहणारा माझा बळीराजा खऱ्या अर्थाने राजा आहे.याचा प्रत्यय येतो.
एक रुपयाची काटकसर करणाऱ्या आणि लाखो रुपये शेतात घालणाऱ्या दोन्ही गोष्टींचा मेळ घालताना मनाचा गुंता झाल्याशिवाय राहत नाही. कितीही अडचण असो कोणत्याही संकटात कंबर कसून उभा राहणाऱ्या माझ्या बळीराजाला सलाम आणि बळीचे राज्य येवो हीच प्रामाणिक इच्छा.
त्याच्यासाठी चारोळी....

**दुःख संकट,महामारीत उभा**
**राहतो जगाचा तो पोशिंदा,**
**मातीत गाळून घाम, मातीतून उगवितो सोनं,**
**शेतमालाला त्याच्या भाव मिळून उगवावा**
**त्याच्यासाठी**
**एक सोनियाचा दिन.**
**एवढीच प्रार्थना.**

# शब्दांच्या पलीकडले पाडगावकर



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**कुंपणानेच शेत खाल्ल तर विश्वास ठेवायचा कोणावर? हा प्रश्न निर्माण होतो. शेतकरी स्वतः च्या शेतातील पिकांचे संरक्षण होण्यासाठी शेताच्या भोवताल कुंपनाचे आवर करत असतात. मग ते कुंपन कशाने ही बनवले असले तरी मुळ मुद्दा असतो शेतातील पिकांचे संरक्षण. परंतु जर कुंपनच शेत खात असेल, जर कुंपनच पिकांची नासाडी करत असेल तर शेतकऱ्यांने दोष कोणाला द्यायचा? हा महत्वाचा प्रश्न उपस्थित राहतो. शेतकऱ्यांच्या कुंपनासारखीच गोष्ट आज देशात घडत आहे. ज्यांनी राष्ट्र, राष्ट्रीय प्रतिके व राष्ट्रातील जनता यांचे संरक्षण करून त्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी घ्यायला पाहिजे तेच लोक देशाला पोखरून कमकुवत करत आहेत. म्हणून देशामध्ये अनेक समस्यांचे थैमान माजले आहे. देशाची राज्याची जबाबदारी ज्यांच्या वर आहे तेच लोक देश व राज्याला खात असतील तर सर्वसामान्य जनतेला काय मिळणार म्हणून सर्वात जास्त समस्या ह्या सर्वसामान्य जनतेच्या समोर आहेत.**

'सांग सांग भोलानाथ , पाऊस पडेल काय' या गीताने आतापर्यतच्या कित्येक पिढ्यांचं बालपण समृद्ध करणारे, 'टपटप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले' म्हणत झाडाभोवती फेर धरुन फुले अंगावर झेलण्याचा आनंद निर्माण करणारे, 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं' या कवितेद्वारे तरुणाईलाच काय तर ज्येष्ठांनाही प्रेमात पाडणारे, 'आयुष्य हे विधात्याच्या वहीतलं पान असतं, रिकामं तर रिकामं , लिहिलं तर छान असतं' म्हणत जगण्याची परिभाषा उलगडणारे सर्वांचे लाडके कवी अर्थात महाराष्ट्रभूषण कविवर्य मंगेश पाडगावकर !

गीतकार , कवी मंगेश पाडगावकर यांचे 'धारानृत्य' , 'जिप्सी', 'छोरी', 'उत्सव' , 'विदूषक' , 'सलाम' हे कवितासंग्रह सुप्रसिद्ध आहेत. पण पाडगावकर म्हंटलं की आठवते , 'भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी' , 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'शुक्रतारा मंद वारा' ही गीते जी, अरूण दाते यांनी गायली आणि आजही ही गाणी रसिकांच्या मनावर अधिराज्य करत आहेत. पाडगावकरांची 'बोलबोल गाणी' म्हणजे बालचमुंसाठी पर्वणीच. त्यांच्या 'वेडं कोकरु' कवितेतून कवीच्या मनातील निरागसता सहज भावते. त्या सोबतच 'सांगा कसं जगायचं , कण्हत कण्हत की गाणं म्हणत' या रचनेतून त्यानी सकारात्मक दृष्टिकोन दिला. किती वैविध्यपूर्ण कविता आहेत ह्या ! प्रेम, यातना, विरह, आत्मभान, जगण्यातील मर्म , आनंद, निसर्गरूप अशा विविध रंगांनी सजलेल्या त्यांच्या कविता आहेत.

विविध कार्यक्रमात, समाज माध्यमावर किंवा भाषणात पाडगावकरांच्या या कवितांचा समावेश असतो पण ह्या कविता म्हणजेच पाडगावकर का ? त्यांच्या आणखी बऱ्याच अशा कविता आहेत, ज्यातून त्यांची स्वभाववैशिष्ट्ये , त्यांचे विचार , जगाकडे, निसर्गाकडे पाहण्याची दृष्टि, जगण्यातले रंग व्यक्त झाले आहेत. अशा कवितांचा आस्वाद घ्यायला नक्कीच आवडेल. नाही का ? पाडगावकरांच्या अशा अविस्मरणीय आणि भावनात्मक कवितांचा आस्वाद रसिक वाचकांना घेता यावा, म्हणून कृष्णा प्रकाशनाने लेखिका, कवयित्री, सूत्रसंचालिका वृंदा दाभोलकर यांचे 'शब्दांच्या पलीकडले पाडगावकर' हे पुस्तक वाचकांच्या भेटीस आणले आहे.



'शब्दांच्या पलीकडले पाडगावकर' या पुस्तकाचे वैशिष्टय म्हणजे पाडगावकरांच्या वैविध्यपूर्ण काव्यलेखनाचा आढावा घेऊन, त्यांच्या भावपूर्ण कविता आणि सोबत त्या कवितांमधून प्रवाहित होणारा अर्थ अशा रचनेने हे पुस्तक साकारले आहे. अर्थात हा प्रवास सोपा नव्हता. लेखिकेने या प्रक्रियेमधून जाताना किती संयम बाळगला असेल, याची कबुली खुद्द लेखिकेने मनोगतात दिली आहे.

पुस्तकातील आशयपूर्ण रचना अधिक भावणारी आहे. एक प्रकारचा निर्मळ प्रवाह संथपणे वाहतो आहे, असे वाटते. कवितेच्या निवडक ओळी, त्याखाली लेखिकेला जाणवलेला भावार्थ किती सोप्या रीतीने व्यक्त केलेला आहे. सूटसुटीतपणा, मोकळेपणा आणि नेमकेपणामुळे पुस्तकातील भाव कुठेही रेंगाळत नाही. साधी - सोपी भाषा, ओघवती निवेदनशैली आणि लेखिकेने व्यक्त केलेल्या भावनेतून कवितेतील रंग डोळ्यांसमोर उभे राहतात.' अल्पाक्षररमणीयत्व' हे या पुस्तकाचे खास वैशिष्ट्य आहे. या पुस्तकात ज्या कवितांचा उल्लेख आहे, या कवितांची निवड किती समर्पकरित्या केली आहे. हे पुस्तक म्हणजे कवितांचे रसग्रहण नाही तर लेखिकेला या कवितांमधून प्रतीत झालेला अर्थ , आस्वादात्मकेतून प्राप्त झालेली मनातील एक तरल संवेदना व्यक्त करणारे हे पुस्तक आहे. पाडगावकरांच्या कविता अभ्यासताना त्यांच्या प्रत्येक कवितेत लेखिकेला भेटलेले 'शब्दांच्या पलीकडले पाडगावकर' नेमके कसे होते, हे जाणून हे पुस्तक नक्कीच वाचायला हवे.

पाडगावकरांच्या कवितांमधील शब्दयोजनेच्या मागे किती बारीक आणि गहन विचार असायचा, या शब्दांचा, अर्थांचा लेखिकेने अत्यंत बारकाईने अभ्यास केला आहे हे पुस्तक वाचताना जाणवते. छोट्या छोट्या शब्दांतून शब्दांच्या पलिकडील अर्थ सांगणाऱ्या या कविता वृंदा दाभोलकर यांनी यथासांग पुस्तकाद्वारे वाचकांपर्यंत पोहचवल्या.

'खुळखुळ घुंगरूपाणी खडक बिलोरी गाणी ' ( बोली ) , 'झाड़ीत काजळी स्तब्ध, थरथरती मिणमिण घाई' ( पहाट ) , सोबतच हाक, फक्त पाचच मिनिट, अंतर, अभंग काळोख, सलाम, गिधाडे, साहेब, उत्तर, निर्विवाद अशा आणि आणखी कवितांचा भावार्थ या पुस्तकाद्वारे आस्वादता येईल.

सामाजिक स्थित्यंतरे, राजकीय भूमिका, निसर्ग, मानवी भावना, प्रेम, विरह, संवेदना, जगण्यातील दुःख, निराशा, मनातील निरागस भाव , सामान्य माणसाची व्यथा, वास्तव अशा विविध विषयांवर पाडगावकरांनी काव्यलेखन केले आहे. त्यांच्या उत्तमोत्तम कवितांचा आस्वाद घेण्यासाठी हे एकत्रीकरण केलेले पुस्तक नक्कीच महत्त्वपूर्ण आहे. मराठी कवितेवर प्रेम करणाऱ्या, कविता अभ्यासणाऱ्या वाचकांना, विद्यार्थ्यांना हे पुस्तक संदर्भग्रंथ म्हणून अत्यंत उपयुक्त असे आहे.

'शब्दांच्या पलीकडले पाडगावकर' या पुस्तकात अतुल अरुण दाते यांनी आपल्या मनोगतातून मंगेश पाडगावकर यांचे कविमनाचे दर्शन तर घडवलेच सोबतच त्यांचे आणि अरुण दाते यांच्यातील सुरेख नातेही उलगडले आहे. ज्येष्ठ कवी, गीतकार अरुण म्हात्रे यांनी पुस्तकाला यथार्थ प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ सुरेश लोटलीकर यांनी साकारले आहे.

**( शब्दांच्या पलीकडले पाडगावकर / लेखिका वृंदा दाभोलकर / प्रकाशक : कृष्णा प्रकाशन / मूल्य : १८० रूपये )**



# अधिकस्य अधिकं फलम्।

आधुनिक केसरी

**दर तीन वर्षातून एकदा येणारा अधिक मास, मल मास, किंवा पुरुषोत्तम मास यंदा अधिक फल देऊन गेला. आता दर तीन वर्षातून एकदा का येतो त्याला अधिक मास का म्हणतात हे सर्व खगोलशास्त्र भूगोलाच्या माध्यमातून सर्वांना माहितच आहे. ते मी आता सर्व सांगत बसत नाही. यावर्षीच्या अधिक महिन्याने मात्र अधिक फल अनेकांना दिले आहे. जसा अधिक मास चालू झाला तेव्हा पासूनच तोबा गर्दी सर्वच तिर्थक्षेत्रांनी खेचलेली पहावयास मिळाली. आमच्या पंढरपूर क्षेत्री तर दररोज दोन ते तीन लाख भक्त येत होते. आषाढी वारीत सुध्दा जेवढी गर्दी झाली होती तिच्या अधिक पटीने गर्दी महिनाभर वहात राहिली.ऐवढी गर्दी की वाटत होतं लोकांना देवाने झपाटले आहे.त्यात एस्.टी.ने महिलांना दिलेल्या पन्नास टक्के सवलतीच्या मुळे महिलांची गर्दी तुलनेने अधिक होती.पन्नास टक्के खर्च बसचा वाचल्यामुळे आलेल्या भोळ्या बायांनी पंढरपूरी खरेदीसाठी हात ढिला सोडला. त्यामुळे व्यापारी खूष आहेत.**

अधिकस्य अधिक भक्त भेटल्याचा आनंद देवाला ही अधिक देऊन गेला.देवाचा मुखमंडलावरची प्रसन्नता ओसंडत होती. त्यामुळे देवाने ही सर्वांना अधिकचा आशीर्वाद दिला असणार.दर्शन रांगेतून घेतलेल्या भक्ताचा आनंद तर दिसत होताच.पण वशिल्याने दर्शन घेतलेल्या व्हीआयपी चे ही चेहरे आनंदले होते. नेहमी दोनचारशे रुपयात दर्शन घडविणार्यांना ही अधिकस्य अधिक फलं प्राप्त झाले. दोन हजार रेट अधिक दर्शनाला होता. अधिकारी, आमदार वगैरे व्हीआयपी यांनी ही दर्शन घेऊन समाधान पावले.गर्दी असूनही थेट मंदिरापर्यंत गाड्या बिनदिक्कतपणे घेऊन जाण्यातही मोठेपणा असतो तो दिसून येत होता.एक सुंदर वाक्य सोशल मीडियावर पहायला मिळाले "रांगेतून दर्शनाला जा.वशिल्याने तुम्ही मूर्ती पर्यंत पोहचू शकता पण देवापर्यंत नाही ". अर्थात ईश्वरत्व समजण्यावर आहे.त्यामुळे दर्शनाला सोडणार्या लोकांना ही अधिक फल देऊन हा मास गेला. अनेक व्यापाऱ्यांना वारी पेक्षा अधिक महिना चांगला समाधानकारक झाला असे ऐकू येत आहे. आषाढी वारी पेक्षा अधिक महिन्यात महिनाभर व्यापार धंदा झाल्याचे बोलले जाते. काही व्यापारी म्हणाले दोन



वर्ष कोरोना काळात बसून खाल्लं, धंदा पाणी काहीच नव्हते.दोन वर्षात शिल्लक पैसे गेले. ते या वारी व अधिक महिन्यात भरुन निघाले. अगदी चहा पासून जेवणा पर्यंत, कुंकू बुक्क्या पासून सराफांपर्यंत सर्वांना व्यापार चांगला झाला. हे अधिकस्य अधिक फलम् म्हणावे लागेल. तीन वर्षातून एकदा हा मास येतो. त्यामुळे या महिन्यात जावयाचा मान अधिक असतो.

अनेक सासुबाईंनी आपल्या लेक जावयांना घरी बोलावून सुग्रास मिष्ठांन्न भोजनाची मेजवानी दिली. विशेषतः पुरणाचे धोंडे खाऊन जावाई खूष झाले. वाणात मुलीला एखादा ऐपती प्रमाणे दागिना, निदान जोडवी , जावयास आहेर यामुळे अर्थचक्र जोरात फिरले.अनेक जावई खूष झाले. आणि पुढच्या अधिकाची वाट पाहू लागले. ( मी ही कुणाचा तरी जावई आहेच हं. )

पंढरपूरच्या स्थानिक लोकांना गर्दी सहन करण्याची सवय आहे. पण महिनाभर गावात गर्दी झाल्याने त्रासदायक वाटले. मात्र टांगेवाले रिक्षाचालक यांनी भरपूर कमाई करताना ते किती प्रवासी बसवत आहेत ह्याचा विचार कुणी केलाच नाही. चालकांना गणवेष नाही, मिटर नाही, कुणी विचारत नाहीत, अठरा वर्षाखालील मुले सुध्दा रिक्षा चालवित होते. बाहेर गावाहून आलेल्या खाजगी वाहनांच्या तर रांगाच रांगा होत्या. आमदार खासदारांनी आपल्या मतदारसंघातील भाविकांची चांगल्या वाहनांची मोठ्या संख्येने सोय केल्याने मोठ्या प्रमाणात भाविक आले होते. त्यांना ही अधिक पुण्य हा महिना देऊन गेला.इतके भाविकांची सोय करुन करुन लोक ही कंटाळल्याचे दिसत होते.

पंढरीरायाचा भक्त म्हटल्यावर हा भोळा असतोच. अनेक महिलांनी पुरणाचे धोंडे घरुन येतानाच करुन आणले होते. श्रध्देने या महिला गाईंना, देवाला मंदिरात देत होत्या. गाईगुरे सुध्दा नंतर ते खाईनात इतके धोंडे तिर्थक्षेत्री आले.ते अनेक छोट्या मोठ्या मंदिरात, रस्त्यावर, झाडांखाली,पहायला मिळाले.एकतर पत्रावळी भरून धोंडे मंदिराच्या शेजारी असणाऱ्या सार्वजनिक शौचालयाच्या भिंती वरती पहायला मिळाले."अन्न हे पूर्णब्रह्म"असं कुठेही पडलेलं पाहून मन सुन्न झालं.अधिक महिन्यात तिसतीन चे महत्त्व असल्याने अनेक मठ, वाड्यातून,घरातून मिष्ठांन्न जेवणाळी झाल्या.काही ठिकाणी दररोज सवाष्ण भोजन असल्याने महिला वर्ग ही आनंदी होता.( कारण घरच्या कामातून सुटका झाल्याने )शिवाय चांगले वस्त्रालंकार काही ठिकाणी देऊन जेवण दिले जात होते. खूप पुण्य लोकांना मिळाले. आत्म्याचे मुक आशीर्वाद लाभले.

खर तर जगद्गुरु तुकोबांनी म्हटलय....ठायीची बैसोनी करा एक चित्त ।आवडी अनंत आळवावा।। किंवा न लगते सायास ।जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ।। ह्या वचनांचा विसर का पडावा. का गर्दी करावी ?का वशिल्याने दर्शन घ्यावे ?का अन्नाची नासाडी करावी ?पत्रं पुष्पं फलं तोयं। अस स्वतः म्हणणार्या देवाच्या दानपेट्या का ओसंडून वाहतात ?या दानपेटीतील दानाचा उपयोग भक्तासाठी किती ?येवढ्या लांबून लांबून भक्त येतात आपले नवस बोल फेडतात. ते खोटे दागिने कसे अर्पण करतील ?जर खोटे दागिने द्यायचेच असतील परिस्थिती मुळे तर तो बोलेलच कशाला ?असे अनेक प्रश्न समोर उभे रहातात. प्रल्हादाला देव भेटला. सावतामाळी यांना भेटला तेही त्याच्या रानात, तुकोबांच्या वह्या रक्षिल्या,नामदेवांना भेटला, कारण त्यांनी आत्मा जाणला.खरा देव जाणला. तसा आपण ही योग्य संतमार्गाने जाऊन देव प्राप्त करावा. अधिक मासा सारख्या महिन्यात भोळे भाभडेपणाने, कर्मकांडातून काय साध्य होईल ?काही करण्यापेक्षा डोळस पणे भक्ती करावी.कारण अध्यात्म हे आत्म्याशी निगडित शास्त्र आहे. असे मला वाटते. तसे करून अधिकस्य अधिक फल प्राप्त करुन घ्यावे. श्री. कृष्णार्पण!!

**दत्ता तरलगट्टी, मुक्त पत्रकार, पंढरपूर.**

# स्वातंत्र्यदिन साजरा करताना..



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्ट १९४७ साली जुलमी, लुटारू व एकमेकांत फुट पाडून सर्वसामान्य जनतेवर अन्याय करणाऱ्या ब्रिटिश राजवटी पासून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. या स्वातंत्र्य लढ्यात अनेक ज्ञात अज्ञात क्रांतीकारकांच्या जिवाचे दानही गेले. जिवाची व जवानीची काळजी न करता अन्याय हत्याचार व जूलुमांविरोधात भगतसिंग, राजगुरू सुखदेव या सारख्या जवांनानी स्वतः च्या जिवाची पर्वा न करता हसत हसत फासावर गेले, अशपाक उल्ला खान सारख्या तरुणांचे जिवन देशहितासाठी अर्पित झाले. या खऱ्या स्वातंत्र्यविराच्या बलीदानामुळेच तर ब्रिटिश सरकारला नमते घेऊन शेवटी देश सोडून जावे लागले. १५ ऑगस्ट १९४७ साली ब्रिटीशांनी भारत देशाची भौगोलिक भुमी भारतीयांकडे देऊन यापुढे भारत देशासोबत केवळ मैत्रीपुर्वक संबध असतील असे जाहीर करून १५ ऑगस्ट १९४७ ला तत्कालीन भारतीय ध्वज फडकवून स्वातंत्र्याचा आनंद साजरा केला गेला.**

देशाच्या माती साठी सांडलेल्या रक्ताला न्याय मिळाला. भागतसिंग, सुखदेव, राजगुरू, अशपाक उल्ला खान सारख्या क्रांतीकारकांच्या प्रयत्नायाचे चित झाले. ब्रिटिश सत्ता गेली त्याचा हा आनंदोत्सव आपण १५ ऑगस्ट १९४७ पासून दररोज साजरा करतो. आणि स्वातंत्र्य लढ्यातील शहीदांना आपण आदरांजली वाहतो. आदरांजली वाहुन त्यांच्या कार्यावर त्यांच्या जिवनावर वेगवेगळ्या बाजुने बोलले जाते. त्यांचे द्रेशप्रेम व देशाला स्वातंत्र्य करण्याची तळमळ बेंबीच्या देठापासून सांगितली जाते. परंतु ज्या उद्देशासाठी भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, अशपाक ऊल्ला खान सारखे तरुण शहीद झाले. त्या शहीदांच्या आठवणीवर केवळ १५ ऑगस्ट ला च भावनिक होणे हा देशद्रोह नाही का ? स्वातंत्र्य दिन साजरा करताना देशासाठी जिवाची बाजी लावणाऱ्या शहीदांच्या विचाराचा, आचाराचा आपण भारत घडवू शकलो का ? यावर समिक्षा कधी करायची ? १५ ऑगस्ट ला भावनिक होऊन भाषण देऊन राष्ट्रभक्ती दाखवणारे वर्षे भर किती राष्ट्रहीताच्या गोष्टी करतात यावर हे ही तपासने आवश्यक आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाच्या भौगोलिक सिमांना स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी १९५० ला मानसाला स्वातंत्र्य मिळाले. आणसाला माणसाप्रमाणे सन्मानाने जगता यावे, सार्वजनिक ठिकाणी जाता यावे, खाता यावे, स्वतः चे मत व्यक्त करता यावे, सार्वजनिक ठिकाणच्या पाणवठ्यावर सर्वांना जाता यावे अशा गोष्टी साठी भारतीय संविधानामध्ये तरदुती करून माणवाला स्वातंत्र्य द्यावे लागले. याचाच अर्थ माणुस किती गुलामीमध्ये याची जाणीव होते. ब्रिटिश भारतावर एकाधिकारशाहीने राज्य करतात, व्यापाराच्या नावाखाली जनतेची लुट करतात, भारतातीलच सैन्य भारतीय लोकांच्या विरोधात वापरतात आणि हे आम्हाला नको आहे म्हणून ब्रिटीशाप़ासुन आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे. आणि जिवाची पर्वा न करता या लुटारू व अन्यायकारी ब्रिटीशाप़ासुन भारताला स्वातंत्र्य करून भारतीय लोकांना सुखी करण्यासाठी सुभाषचंद्र बोस सारख्या तरुणाने तुम मुझे खुन दो मै तुम्हे आझादी दुंगा म्हणत सरळ सरळ रक्त सांडल्या शिवाय ब्रिटिश अन्याय कारी सरकार झुकणार नाही म्हणून अनेकांनी आपले रक्त सांडवले, देशातील प्रत्येक काना कोपऱ्यात क्रांतीकारकाचे रक्त सांडलेले आहे. आणि म्हणून स्वातंत्र्य दिन साजरा करताना त्या रक्ताची आम्हाला कींमत आहे का याचा ही विचार स्वातंत्र्य दिनी व्हायला पाहिजे. ब्रिटिश भारताला लुटत होते म्हणून आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे होते. ब्रिटीश अधिकारी अन्याय अत्याचार करत होते म्हणून आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे तर स्वातंत्र्या नंतर भारतीयांची लुट थांबली का ? स्वातंत्र्यानंतर अन्याय अत्याचार थांबले का ? ब्रिटिश वाईट होते परकीय होते म्हणुन रक्त सांडवून त्यांना पळवून लावले. परंतु स्वातंत्र्याच्या आणि राष्ट्रप्रेमाच्या गप्पा करणारे लोक राष्ट्र व राष्ट्रीय हित या विषयी गंभीर आहेत का ? ब्रिटीशांनी फोडा आणि राज्य करा चे धोरण राबवून देशात फुट पाडली व सत्ता भोगली. मग सध्याचे सरकार नेमके काय करते ? हिंदु मुस्लिम वाद घडवून आणुन राजकीय पोळी भाजली जाते. हे नाकारून



स्वातंत्र्यदिन साजरा करणे म्हणजे शहिदांच्या विचाराशी व त्यागाशी द्रोह करणे होय. ब्रिटिशांनी देशाला लुटले व त्यांचे नोकर बनवण्यासाठी, त्यांच्या फायद्यासाठी का होईना शाळा, नोकरी निर्माण केली, रेल्वे, टपाल, निर्माण करून प्राथमिक सुविधा दिल्या, परंतु भारतीय राज्यकर्त्यांनी लुट तर केलीच परंतु मुलभूत सुविधा देखील कमी केल्या. म्हणजे एकीकडे स्वातंत्र्य दिन साजरा करून मी किती राष्ट्रभक्त आहे हे दाखवून दुसरीकडे मात्र लोकांची लुट होताना, मुलभूत सुविधा न मिळताना, मानवी स्वातंत्र्यावर बंधने येताना, जातीय दंगली मध्ये सर्व सामान्य तरुणांवर गुन्हे दाखल होताना, पंधरा ऑगस्ट ला राष्ट्रभक्ती अंगात आणणारे लोक जातात तरी कुठे ? स्वातंत्र्य लढ्यात शहीद झालेल्या शहिदांना केवळ ब्रिटीशांनी देश सोडून जावे एवढेच वाटत नव्हते तर देशात लुट होणार नाही, देशात कोणावर अन्याय अत्याचार होणार नाही आणि आम्ही भारतीय लोक सुखी समाधानाने राहु या साठी त्यांचा लढा होता. परंतु आज राज्यकर्त्येच हिंदु मुस्लिम द्वेष पसरवून माणसामाणसा भेद करतात अशा लोकांना ब्रिटीशांनी आम्हाला फोडून राज्य केले असं बोलण्याचा तरी नैतिक अधिकार आहे का ? स्वातंत्र्य भारतात प्रत्येक नागरिकांना शिक्षण, नोकरी व आरोग्य सुविधा मिळायला पाहिजे अशी कायदेशीर तरतूद असताना ही ते मिळते का ? मनीपुर मध्ये महिलांना बलात्कार करून नग्न धिंड काढली जाते, नांदेड मध्ये भिम जयंती साजरी केली म्हणून हत्या केली जाते, मुबंई मध्ये महिलेची हत्या करून कुकर मध्ये शिजवून मिक्सर मध्ये बारीक केले जाते, लैंगिक अत्याचाराच्या विरोधात आंतरराष्ट्रीय पातळीवर महिला खेळाडूंना न्यायासाठी रस्त्यावर बसावे लागते, आणि सरकार तेथील लाईट, पाणी बंद करून जागतिक पदके मिळवलेल्या खेळाडूंना खाली पाडून तुडवले जाते. शेतकरी फासावर लटकतो, फि भरायला पैसे नाही म्हणून आई आत्महत्या करते कारण आत्महत्या केल्यावर सरकार काही मदत माझ्या मुलाला करेल हे सर्व स्वतंत्र भारतात घडते. राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा मान्य नसणाऱ्याला पोलीस संरक्षण दिले जाते. राष्ट्रपतींना मंदीराच्या गाभाऱ्यात जाता येत नाही, उच्च जातीतील व्यक्ती सर्व सामान्य माणसाच्या तोंडावर मुतती, कुठे जबरदस्ती घाण पाणी पाजले जाते. जबाबदार असलेले लोक जगजाहीर खोट बोलुन बाजूला होतात, शिक्षा होताना गुन्हेगाराचा गुन्हा नाही तर जात बघून पाऊस उचलले जाते. पुस्तके वाचणारे लोक तुरुंगात तर भारतीय संरक्षण विभागाची गुप्त माहिती शत्रु राष्ट्राला देणाऱ्या वर देश द्रोहाचा खटला भरला जात नाही हे याच स्वतंत्र देशात घडले जाते. राष्ट्रभक्तीचा निव्वळ देखावा केला जातो परंतु राष्ट्रहिताच्या बाबी मात्र जोपासल्या जात नाहीत. देशाच्या ध्वजाला चक्रध्वज म्हणतात. परंतु सरळ सरळ तिरंगा म्हणून ध्वजाचा अवमान करणारे, देशाचे नाव इंडिया अर्थात भारत असे कलम क्रमांक एक मध्येच नमुद असताना ही देशाला वेगवेगळ्या नावाने संबोधने हा देशद्रोह नाही तर काय आहे ? ध्वजाला तिरंगा म्हणून जाणीव पुर्वक एका रंगाला डावलले जाते, रंग हे कोणत्याही जाती धर्माशी संबधित नसेल तरीही ध्वजाला तिरंगा बोलणे हा राष्ट्रद्रोह आहेच पण हे मान्य करायला नैतिकता कुणाकडे आहे ? भारतीय चक्रध्वज अर्थात भारतीय ध्वज याचे प्रमाण ३:२ आहे. झेंडा किती ही लहान किती ही मोठा बनवता येतो पण प्रमाण बदलता येत नाही. तिन रंगाच्या पट्या सारख्या आकाराच्या आणि मध्य भागी अशोक चक्र याच प्रमाणात असलेल्या वस्तु ला चक्रध्वज अर्थात देशाचे सर्वोच्च प्रतीक म्हणतो. परंतु बेगडी राष्ट्राभिमान दाखवण्यासाठी नुसत्या कपड्याच्या मुळ आकारात नसलेल्या पट्या लाऊन ध्वज होत नसतो तरीही त्याला ध्वज म्हणले जाते. या ध्वजाचा अवमान नाही का ? थोडक्यात काय तर आजही भारतीय लोकांना भारतीय स्वातंत्र्य, भारतीय कायदा, भारतीय राष्ट्रीय प्रतीके व भारतीय कायदे याविषयी आपुलकी नाही. वर्षे भर आणि स्वातंत्र्य दिनीही ध्वजाचा, देशाच्या नावाचा अवमान होत असेल तर आम्ही स्वतंत्र दिवस व त्या मध्ये शहीद झालेल्या जवाणांविषयी किती गंभीर आहोत याची प्रचीती येते. स्वातंत्र्य दिन साजरा करताना शहीदांच्या रक्ताला आम्ही न्याय देऊ शकलो का ?द्यायचा असेल तर तो कसा द्यावा ? ब्रिटीशांचा विरोध ज्या उद्देशासाठी केला होता तो उद्देश पुर्णत्वास गेला का ? आजही न्यायासाठी जनतेला रक्त सांडावे लागते, शेतकऱ्यांना गळ्याला फास लावावा लागतो. महिलांवर बलात्कार होऊन बलात्कारांचे जंगी स्वागत जर स्वतंत्र भारतात होत असेल तर देशाच्या स्वातंत्र्याचा फायदा सर्व सामान्य लोकांना कधी होणार ? कोणताही दिवस साजरा करताना आपण समिक्षा करणे आवश्यक आहे म्हणून स्वातंत्र्य दिन साजरा करणे म्हणजे केवळ शहिदांना शाब्दिक आदरांजली वाहने नाही तर शहिदांच्या स्वप्नातील भारत उभा करणे होय. म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना आपण समिक्षा करून सत्य परिस्थिती मांडली पाहिजे, आणि जनतेची लुट, अन्याय अत्याचार थांबवून जनतेला शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, समान संधी निर्माण करून दिली पाहिजे. धर्माचा गर्व करणाऱ्यांना जागीच बंधने घालुन राष्ट्राभिमान जागृत करणाऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. स्वातंत्र्य दिन साजरा करताना जबाबदारी चे ओझे येत असते. पंच्चेहत्तर वर्षे होऊनही आमच्या मनात मी प्रथम भारतीय व मी अंतीम भारतीय ही भावना रूजली नसेल तर हि शोकांतिका आहे. आणि म्हणून स्वातंत्र्य दिन साजरा करताना वरिल बाबींचा जात धर्म पंथ वर्ण बाजुला सारुन राष्ट्र हित, राष्ट्रसन्मान, राष्ट्राभिमान निर्माण करणे आवश्यक आहे. फक्त भाषण देऊन स्वातंत्र्य दिन साजरा करता येत नाही. स्वातंत्र्यदिन साजरा करताना आपण समिक्षा सत्य मांडले पाहिजे. ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीमधून भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी ज्या शहिदांनी आपल्या जिवाचे दान दिले अशा सर्व ज्ञात अज्ञात शहिदांना आदरांजली.....

# आपल्या आचरणातून पर्यटकांचे मन जिंका : मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटनासाठी येणाऱ्या एकून पर्यटकांपैकी 50 ते 60 टक्के पर्यटक हे मोहुर्ली प्रवेशद्वारातून पर्यटनासाठी जायला प्राधान्य देतात. त्यामुळे या पर्यटकांना आपण चांगली वागणूक, चांगला संदेश, चांगल ज्ञान देण्याची एक मोठी जबाबदारी आपल्यावर आहे. त्यामुळेच आपल्या आचरणातून आपण ईथे येणाऱ्या पर्यटकांची मने जिंकावीत असे आवाहन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी येथील कार्यक्रमात केले.

मोहुर्ली येथे नविन अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त अशा प्रवेशद्वार बांधकामाच्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वनमंत्री मुनगंटीवार यांच्यासह मुख्य वन संरक्षक डॉ. रामगावकर, मोहुर्ली च्या सरपंच सुनिता कातकर , राजस्थान स्टेट बोर्ड चे सुनिल मेहता , श्वेता बोडू, उपवनसंरक्षक, मध्य चांदा विभाग , संध्या गुरनुले , डॉ. मंगेश गुलवाडे , प्रकाश धारणे , आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना वनमंत्री मुनगंटीवार यांनी मोहुर्ली येथे 7 कोटी 42 लाख रुपये खर्चून भव्य प्रवेशद्वार ,वातानुकूलित प्रतीक्षालय, पार्किंग व्यवस्था , तिकीट गृह , वस्तू विक्री केंद्र, उभारण्यात येणार असल्याची माहीती दिली. मोहुर्ली हे गाव देशातील सर्वोत्तम पर्यटन सेवा देणार गावं व्हावं , आनंद वाटणारं गाव व्हावं या दृष्टिने प्रयत्न व्हावे असे आवाहन यावेळी केले. तर येणार्या काळात येथे थ्री डी डायमेन्शन प्रमाणे सेव्हन डी च थिएटर तयार करण्यात यावे व त्याचा आराखडा तयार करण्यात यावा आणि गाव सुंदर व सुशोभीकरण करण्याच्या दृष्टिनेही सुचना करण्यात आल्या.




या कार्यक्रमाच्या औचित्याने सुविख्यात आंतरराष्ट्रीय वन्यजिव छायाचित्रकार नल्ला मुथ्थू यांनी छायाचित्रण व दिग्दर्शित केलेल्या व्याघ्र गिताच्या मराठी आवृत्तीचे लोकार्पण करण्यात आले. शिवाय माया वा वाघिनीवरील लघुचित्रपट ही यावेळी दाखविण्यात आला. याचे संपूर्ण चित्रीकरण हे ताडोबा अभयारण्यात करण्यात आले आहे हे विशेष.

या लोकार्पणानंतर वनमंत्री मुनगंटीवार यांनी नल्ला मुथ्थू यांना या व्याघ्र प्रकल्प आणि येथील वाघावर 30/40 मिनिटांचा लघुचित्रपट तयार करावा अशी सुचना करीत त्यासाठी लागणारा सर्व खर्च सीएसआर निधीतून देण्यात येईल असे आश्वासन दिले. आपल्या प्रास्ताविकातून मुख्य वनसंरक्षक डॉ. रामगावकर यांनी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात करण्यात येत असलेल्या विविध सोयीसुविधा, वन व व्याघ्र संवर्धनासाठी करण्यात येत असलेले विविध प्रयत्न याबाबत माहीती दिली. प्रज्ञा नागपूरे जिवनकर यांनी सूत्रसंचालन केलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# उरण येथे लवकरच वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन होणार : अ‍ॅड. नवाळे

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** न्यायालयामधे लवकरच वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन



होणार असल्याचे उरण वकिल संघटनेचे अध्यक्ष अँड. दत्तात्रेय नवाळे यांनी सांगितले. उरण तालुक्यातील रूपये पाच लाख रक्कमेच्या वरील दिवाणी दाव्या मधील पक्षकार आणि त्यांचे वकिल यांना पनवेल येथे येण्या जाण्या करता होणारा त्रास वाचवण्याकरता उरण येथे वरिष्ठ न्यायालय स्थापन होणे गरजेचे झाले आहे.

पनवेल येथील वरिष्ठ न्यायालयामधे उरण, पनवेल, कर्जत व खालापुर येथील ४ न्यायालयांचे दिवाणी दावे, दिवाणी अर्ज, भुसंपादनाचे अर्ज यांचे विषयी कामकाज चालत असते. त्यामधे अधिकाअधिक काम उरण तालुक्यामधुन आलेले असते. पनवेल येथे जाणे येणे करता संबंधीत वकील व पक्षकार यांना जवळ जवळ ५० कि.मी.चा प्रवास करावा लागतो. त्यामुळे प्रवासातच त्यांचा पैसा व वेळ वाया जातो व त्यामुळे त्यांची गैरसोय होते. सदरची गैरसोय टाळण्याकरता उरण येथे वरिष्ठ न्यायालयाची स्थापना होणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन उरण न्यायालयाचे अध्यक्ष व त्यांचे कार्यकारीणीने उरण न्यायालयामधे वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापने करता कार्यकारीणीचे सभेमधे ठराव मंजुर करून सदरचा ठराव जिल्हा न्यायालय अलिबाग यांच्या कडे पाठविला. जिल्हा न्यायालय अलिबाग यांनी सदरचा प्रस्ताव उरण न्यायालयाचे पनवेल येथील वरिष्ठ न्यायालयामधे चालविले जाणारे सर्व दिवाणी अर्जाची व दाव्याची माहिती मागवुन उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे मंजुरी करता पाठविला आहे.

उरण येथे वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्याकरता लागणारी दाव्याची संख्या पुरेशी असल्यामुळे नियमाप्रमाणे उच्च न्यायालय मुंबई सदरची बाब मंजुर करण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे आता वकिल व पक्षकार यांना पनवेल न्यायालयामधे जाण्याकरता लागणारा वेळ व पैसा वाचणार आहे. या करता उरण न्यायालयाच्या वकिल संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड.दत्तात्रेय नवाळे, उपाध्यक्ष अ‍ॅड.भारती भोईर, उपाध्यक्ष अ‍ॅड. किशोर ठाकुर, अ‍ॅड.प्रसाद पाटील, सचिव अ‍ॅड. अर्चना माळी, अ‍ॅड. प्रतिभा भालेराव, उपसचिव अ‍ॅड.संतोष पाटील, लेखापरीक्षक तसेच अ‍ॅड. अझीमीन अन्सारी , अ‍ॅड.वृषाली पाटील, अ‍ॅड. विपुल ठाकुर, अ‍ॅड. धिरज डाकी सर्व सदस्य तसेच वरिष्ठ वकिल अ‍ॅड. एम.एम. मोकल, अ‍ॅड. मोहन थळी, अ‍ॅड. भानुशाली वगैरे वकिलांनी मोलाचे सहकार्य केले आहे.



# आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत भेंडखळ ग्रामपंचायत येथे ध्वजारोहण उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे मेरी माटी मेरा देश अभियाना अंतर्गत दिनांक 13 ऑगस्ट रोजी उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत कार्यालयावर राष्ट्रध्वज फडकविण्यात आले. ध्वजारोहन ग्रामपंचायतचे उपसरपंच दीपक ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास ग्रामपंचायतच्या सरपंच मंजिता पाटील, माजी उपसरपंच संगीता भगत, ग्रामपंचायत सदस्य अजित ठाकूर,लिलेश्वर भगत, अभिजीत ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सोनाली ठाकूर, स्वाती पाटील, स्वाती घरत, शितल ठाकूर, प्राची पाटील, अक्षता ठाकूर, ग्राम विकास अधिकारी दिलीप तुरे, वरिष्ठ लिपिक दिपाली मते, निशा वशीकरण, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पाटील सर, विकास म्हात्रे, भगत मॅडम, विजया भगत, अंगणवाडी सेविका शारदा मॅडम, कल्पना ठाकूर, अंगणवाडी सेविकांचा पूर्ण स्टाफ, जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी हजर होते. एकंदरीत शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे भेंडखळ ग्रामपंचायत मध्ये आजादीका महोत्सव अंतर्गत ध्वजारोहण मोठया उत्साहात संपन्न झाले.

# तलाठी भरतीसाठी १० लाख ४० हजार अर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** तलाठी भरतीसाठी यंदा विक्रमी १० लाख ४० हजार ७१३ अर्ज, परीक्षेसाठी शारीरिक विकलांग आणि महिला उमेदवारांना दिलेले प्राधान्य आणि अनेक उमेदवारांनी राज्यातील ठरावीकच जिल्हे परीक्षा देण्यासाठी निवडले आहेत. या व अशा विविध कारणांमुळे तलाठी भरती परीक्षेसाठी अनेक उमेदवारांना जिल्ह्याबाहेर परीक्षा केंद्र मिळाले आहे, अशी स्पष्टोक्ती भूमी अभिलेख विभागाकडून सोमवारी रात्री उशिरा करण्यात आली. ही परीक्षा १७ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या कालावधीत घेतली जाणार आहे. अनेक उमेदवारांना त्यांनी निवडलेल्या केंद्रापेक्षा दूरचे केंद्र मिळाल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर जमाबंदी आयुक्त निरंजन सुधांशू यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक पार पडली. या बैठकीत गुरुवारपासून सुरू होणाऱ्या परीक्षेबाबत चर्चा करण्यात आली.



# लोणंद येथे नेत्र तपासणी शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** रोटरी क्लब लोणंद आणि बुधरानी हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू निदान नेत्र तपासणी शिबीर संपन्न झाले.

या शिबिरातून १५९ रुग्णांची तपासणी करण्यात आली.सामाजिक बांधिलकी जपणारे महत्त्वपूर्ण कार्य पडत असताना या कार्याबद्दल लोकांनी विशेष कौतुक केले.कार्यक्रमाचे उद्घाटन रोटरीचे चार्टर मेंबर रोटरीन विश्वनाथ शानबाग त्यांच्या हस्ते करण्यात आले. रोटरीचे अध्यक्ष रोटरीन पंढरीनाथ चव्हाण,सचिव प्राजित परदेशी, रोटरीन डॉ. विजयकुमार देशमुख,रोटरीन गोपाल खंडारे, डॉ.किशोर बुटीयांनी, प्रवीण चांदवडकर तसेच बुधरानी हॉस्पिटलचे डॉक्टर पाटील,नेत्रचिकित्सक योगिता जाणवे,नेत्रचिकित्सक कुमारी गायत्री चांदवडकर, नेत्रचिकितचक प्रवीण चांदवडकर उपस्थित होते. रोटरी क्लब लोणंद व बुधरानी हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अशाप्रकारे नेत्र तपासणी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत चांदवडकर वॉच अँड ऑप्टिशियन शास्त्री चौक लोणंद आयोजित करण्यात येणार आहे.शिबिराचा लाभ गरजूंनी घ्यावा. असे आवाहन रोटरीचे अध्यक्ष रोटरीन पंढरीनाथ चव्हाण व रोटरीन प्रवीण चांदवडकर यांनी केले.शिबिरामध्ये डोळ्यांच्या सर्व तपासण्या अत्याधुनिक मशीनच्या सहाय्याने करण्यात येणार असून गरजू रुग्णांना अत्यल्प व सवलतीच्या दरात डोळ्यांच्या सर्व शस्त्रक्रिया बुधरानी हॉस्पिटल पुणे येथे करण्यात येणार आहेत.



# आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप

## स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला मराठा प्रतिष्ठानचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय मूलभूत सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी सोमवारी (दि.१४) स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला एक हात मदतीचा या उपक्रमात २५० आदिवासी विद्यार्थ्यांना निंबायती येथे मोफत दप्तर वितरण करण्यात आले मराठा प्रतिष्ठांन व अशोक गोयल फाउंडेशन च्या संयुक्त विद्यमाने निंबायती गाव येथे हा उपक्रम राबविण्यात आला आहे.यावेळी तहसीलदार मोहनलाल हरणे पोलीस निरीक्षक अनमोल केदार,मराठा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोपान गव्हांडे जिल्हाध्यक्ष विजय काळे, माजी सभापती चंद्रकांत पाटील,आदिवासी तडवी भिल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अलीबाबा तडवी आदींची प्रमुख उपस्थिती होती.



या उपक्रमात निंबायती येथील प्राथमिक शाळेतील पहिली ते सातवीच्या २५० विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वितरण करण्यात आले यावेळी तहसीलदार हरणे पोलीस निरीक्षक अनमोल केदार सोपान गव्हांडे अली बाबा तडवी आदींनी मनोगत व्यक्त करून या सामाजिक उपक्रमातून सामाजिक एकता निर्माण व्हावी असे मत पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांनी व्यक्त करून आदिवासी विद्यार्थ्यांनी शिक्षणाची कास धरावी व मोठे व्हावे असे तहसीलदार हरणे यांनी सांगितले सोपान गव्हांडे यांनी सामाजिक हेतू बाळगून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची भावना व्यक्त केली मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तर वितरण करण्यात आले यावेळी ग्रामपंचायत सदस्य अनुप तडवी, करीम तडवी, आदींनी ग्रामस्थांच्या वतीने मान्यवरांच्या सत्कार केला यावेळी तालुकाध्यक्ष विजय चौधरी यांनी प्रास्ताविक केले कार्यक्रमासाठी सरपंच गणेश माळी,सोमु तडवी,समाधान घुले,प्रमोद वाघ नाब्बास तडवी जबिर तडवी, ज्ञानेश्वर युवरे विनोद पाटील, सुधाकर पाटील ज्ञानेश्वर गवळी, दिनेश पाटील गणेश तायडे प्रशांत पाटील, करीम तडवी,सिराज तडवी, शोएब तडवी, सुभेखा तडवी,जुबेर तडवी, शबानूर तडवी राईस तडवी आदींसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. आभार गणेश माळी यांनी मानले.

# वाहनाच्या धडकेने तरुण जागीच ठार

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** जिल्ह्यातील जामनेर येथील पळासखेडा मिराचे गावानजीक काल सायंकाळच्या सुमारास अपघात झाला. या अपघातात जामनेर येथील २७ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. घरातील कर्ता पोरगा गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. घरी जात असलेल्या तरूणाच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने समोरून जोरदार धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुदैवी घटना सोमवारी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास घडली. ही घटना जामनेर तालुक्यातील पळासखेडा मीराचे गावानजीक घडली आहे. दिपक गणेश भोई वय २७, रा. जामनेर असं मयत तरूणाचं नाव आहे. दिपक घरातील कर्ता पुरूष होता.

या दुर्दैवी घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.सोमवारी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास दीपक हा त्याच्या एमएच १९ डि एच २९०७ या क्रमाकांच्या दुचाकीने घरी जाण्यासाठी नेरी मार्गे जामनेर येथे जाण्यासाठी निघाला होता. रस्त्यावरील पळासखेडा मिराचे गावाजवळून जात असताना अज्ञात वाहनाने समोरून दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत दिपक भोई चा जागीच मृत्यू झाला.घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेउन पोलिसांना घटनेची माहीती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेवून जामनेर उपजिल्हा रुग्णालय मृतदेह दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी रात्री उशीरापर्यंत जामनेर पोलीस ठाण्यात नोंद घेण्याचे काम सुरू होते. दरम्यान, मयत दिपक भोई याचा मोठा मित्र परिवार होता . दिपक गेल्याने गावात शोककळा पसरली आहे. पुढील तपास जामनेर पोलीस करत आहे.

# पुण्यातील धरणांमध्ये ९१ टक्के पाणीसाठा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रांत गेल्या काही दिवसांपासून पाऊस ओसरला आहे. दिवसभरात पावसाने उघडीप दिली. धरणांच्या परिसरात कमी-अधिक प्रमाणात होत असलेल्या पावसामुळे एकूण पाणीसाठा ९१ टक्क्यांवर पोहोचला आहे. पानशेत धरण १०० टक्के भरल्याने या धरणातून आंबी नदीत पाणी सोडण्यात येत आहे.

या चारही धरणांत मिळून एकूण २६.४८ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच ९०.८५ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. दिवसभरात टेमघर आणि खडकवासला धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने विश्रांती घेतली, तर वरसगाव आणि पानशेत धरणांच्या परिसरात अनुक्रमे तीन मिलिमीटर आणि एक मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. सध्या टेमघर धरणात २.६६ टीएमसी (७१.६३ टक्के), वरसगाव धरणात ११.७३ टीएमसी (९१.४७ टक्के), पानशेत धरणात १०.६५ टीएमसी (१०० टक्के) आणि खडकवासला धरणात १.४५ टीएमसी (७३.५३ टक्के) पाणीसाठा जमा झाला आहे. , पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरण परिसरात दिवसभरात २७ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. सध्या या धरणात ८.२० टीएमसी (९६.३६ टक्के) पाणीसाठा जमा झाला आहे. जिल्ह्याच्या इतर धरणांपैकी कळमोडी, चासकमान, वडीवळे, आंद्रा, कासारसाई, नीरा देवघर, भाटघर, वीर या धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा जमा झाला आहे.उजनी धरणात केवळ ७.०८ टीएमसी (१३.२२ टक्के) जमा झाला आहे.

# परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या मराठा कुणबी विद्यार्थ्यांना रू.२७५ कोटी शिष्यवृत्ती मंजूर : राजेंद्र दाते पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सारथीसाठी असलेल्या परदेशी शिष्यवृतीबाबत वित्त आणि शिक्षण विभाग यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या बैठकी समोर घेऊन तात्काळ मान्यता मिळावी म्हणून गेली २०२० साला पासुन प्रयत्नशील असणारे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांच्या प्रयत्नांना यश आले असुन सदरचा प्रस्ताव अंतिम रित्या मंगळवारी दि ०४ जुलै २०२३ रोजी मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णय मराठा, कुणबी विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणा साठी सयाजीराव गायकवाड - सारथी शिष्यवृत्ती योजना अंतर्गत ७५ विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्य वृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला तशी जाहीरात सुध्दा राज्य शासनाने प्रसिध्द केली असुन असुन जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांच्या अथक पाठ पूराव्या मुळे मराठा कुणबी विद्यार्थ्यांना आता पदव्युत्तर उच्च शिक्षणा साठी ३० लाख तर संशोधन पी एच डी साठी ४० लाख रुपये मिळणार असल्यामूळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण व संशोधन करण्याची संधी मराठा कुणबी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती च्या रूपाने मिळणार असल्याने राज्य शासनाचे व सारथी संस्थेचे मनस्वी आभार जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले आहे.

शासनाच्या नियोजन विभागाचे अतीरिक्त मुख्य सचिव भारतीय प्रशासनिक सेवेचे विजय सौरभ यांचे कडे सातत्याने पाठपुरावा मुख्यमंत्र्यांच्या निर्देशा प्रमाणे त्यांनी केला होता.जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची मुळ मागणी होती की, परदेशी शिष्यवृत्तीचे स्वप्न पाहणाऱ्या मराठा कुणबी विद्यार्थ्या साठी सारथी संस्थेच्या वतीने मराठा समाजा तील विद्यार्थ्यांच्या उत्थानासाठी सदरची बाब मंजुर होणे गरजेचे होते. सारथी संस्थेने गुणवंतविद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची घोषणा खुप पुर्वी केली होती परंतु निधी ऊपलब्ध नव्हती त्यावर राजेंद्र दाते पाटील यांचा सतत पाठपुरावा सुरू होता. परदेशातील नामांकित विद्यापीठे व शिक्षण संस्थांचे शुल्क प्रचंड असल्यामुळे सामान्य मराठा कुणबी विद्यार्थी वर्गाला सदर फीस भरणे शक्य नाही. म्हणून परदेशी शिष्यवृत्ती साठी शासन सकारात्मक निर्णय राज्य शासनाच्या वतीने घेण्यात आला आहे.

हलाखीमुळे अनेक विद्यार्थ्या मध्ये गुणवत्ता असूनही ते परदेशी शिक्षण घेण्या पासुन वंचीत रहात असत ते हे शिक्षण घेऊ शकत नाही म्हणून जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी या बाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कडे विनंती केली होती की, अत्यंत गांभीर्याने जनहितार्थ विचार होऊन मराठा कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना सुध्दा पदव्युत्तर व पीएच.डी.चे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीचा आता उपयोग होणारआहे.विद्यार्थ्याला पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी साठी क्यूएस वर्ल्ड रैंकिंग' दोनशेच्या आतील विद्यापीठ किंवा शिक्षण संस्थेत प्रवेश मिळायला हवा ही राजेंद्र दाते पाटील यांची अत्यंत अभ्यासु व दूरदृष्टीची मागणी होती, पदव्युत्तर पदवीसाठी कमाल ३० लाख रुपये, तर पीएच.डी.साठी कमाल ४० लाख रुपये वार्षिक शिष्यवृत्ती देण्याचा त्यांची मागणी सातत्याने होती ती या जाहिराती मुळे पूर्णत्वास जात आहे.

परदेशी शिष्यवृत्ती बाबत वित्त आणि उच्च शिक्षण विभाग यांनी मंजुरी दिलेली असुन मराठा कुणबी वर्गासाठी एक आश्वासक चेहरा म्हणून जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांचे नावं पुढे आल्याची चर्चा संपुर्ण महाराष्ट्रात आणि प्रशासनात असुन मराठा आरक्षण मिळाल्या शिवाय पायात वाहन म्हणजे चप्पल बुट घालणार नाही ते आताही अनवाणी पायाने उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय,सारथी कार्यालय, मंत्रालय आदी ठिकाणी अनवाणी पाठपुरावा करत फिरत होते त्यामुळे त्यांचे बाबत प्रचंड आदर निर्माण झाला असुन या बाबत त्यांनी कधी ही या त्यागाचे भांडवल केलेले नसुन खडे दगड टोचल्या मुळे पायातून प्रसंगी रक्त प्रवाह येतो व पायावर सुज कायम असते पण मराठा आरक्षणाचा हा लढवय्या ध्येयाने प्रेरीत असल्या मूळे कशालाच जुमानत नाही अगदी लग्न कार्य अंत्यविधी अशा विविध कार्यक्रमास हा पठ्या अनवाणी च असतो ही बाब विशेष होय.

महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत शिष्यवृत्ती योजना मराठा- कुणबी विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी ठरली असुन

महाराष्ट्रातील समस्त मराठा- कुणबी विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी प्राप्त झाली असुन सारथी संस्था पुणे यांचे कडून परदेशात उच्च शिक्षण म्हणजे पोस्ट ग्रॅज्युएशन शिक्षण आणि संशोधन कार्यात म्हणजे पीएचडी करण्या साठी सारथी संस्थेच्या वतीने शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आहे. त्या अनुषंगाने जाहीरात विवीध वृत्तपत्रा मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या महत्वपूर्ण शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन ॲप्लिकेशन अर्ज भरणे दाखल करणे आवश्यक आहे. दिनांक १४ऑगस्ट २०२३ सोमवार पासून ऑनलाईन ॲप्लिकेशन अर्ज भरणे प्रक्रिया सारथी संस्थे मार्फत सुरु करण्यात येत असुन ज्यांना लाभ घ्यायचा आहे अशा समस्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन ॲप्लिकेशन अर्ज करून या महत्वाच्या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले असुन विद्यार्थी वर्गाने यातील सुचना अटी- शर्ती यांचे काळजी पूर्वक वाचन करून तद पश्चात आपला अर्ज सारथी संस्था पुणे यांचे कडे सादर करावा अशी नम्र विनंती राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.



# भाजपाचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश यांच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने भाजपाचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश यांच्या हस्ते ध्वजारोहण व भारत माता प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये, प्रवक्त्या श्वेता शालिनी, ज्येष्ठ कार्यकर्त्या शैला सामंत,कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी,सहसचिव भरत राऊत, आदी उपस्थित होते.यावेळी देशाची फाळणी झाल्यामुळे झालेल्या वेदनांचे स्मरण ठेवण्यासाठी चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थितांनी यावेळी देशसेवेसाठी समर्पित होण्याची "पंचप्रण" शपथ घेतली.



# हणमंत शेळकेंचे गडकरींना निवेदन

## जीर्ण खेमावती पूल प्रश्नी मांडली व्यथा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गेली अनेक वर्षा पासून लोणंद ता.खंडाळा येथील लोणंद शिरवळ रस्त्यावर जीर्ण स्वरूपात असलेला खेमावती नदीचा पुल हा अडचणीचा होऊन बसलेला आहे. या परिसरातून ये जा करताना इथल्या रहिवाशांना, प्रवाशांना जणू मृत्यूला कवटाळूनच प्रवास करावा लागत आहे.हा पूल खूपच लहान असल्याने या पुलावरून अवजड वाहनांची मोठी वाहतुक होत असते.मोठी दुर्घटना होईल अशी परिस्थिती असल्याने या पुलावरून विविध अडचणींचा सामना लोकांना करावा लागत आहे.इथे नव्याने पूल बांधून ही अडचण कायमची सुटावी.म्हणून लोणंद नगरीचे माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते हणमंत विनायकराव शेळके पाटील वारंवार प्रयत्न करताना दिसत आहेत. त्यांच्या कडून संबंधित विभागासह लोकप्रतिनिधी यांना सुद्धा निवेदने देण्यात आलेली आहेत. परंतू या प्रकरणी कोणताही तोडगा निघताना दिसत नाही. अखेर केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे हा प्रश्न हणमंत शेळके यांना घेऊन जावे लागले.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे पुण्यात उड्डाण पुलाच्या लोकार्पण सोहळ्यास आले असता भारतीय जनता पार्टीचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या मार्फत हणमंत शेळके यांनी केंद्रीय नितीन गडकरी यांची भेट घेतली.खेमावती पूल प्रश्नासह व्यवस्थित भूसंपादन न झालेल्या शेतकऱ्यांच्या विषयाबाबत त्यांनी चर्चा करत निवेदन दिले. यावेळी मंगेश मासाळ,मुरलीधर मोहोळ आदी उपस्थित होते. लोणंद-शिरवळ रोड ( सध्याचा राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ डीडी ) वरती लोणंद मधील खेमावती नदीवरील ब्रिटिशकालीन जुना जीर्ण झालेला अरुंद पूल पूर्णतः नवीन बांधणेबाबत व याच



महामार्गा वरील जमिनीचे गेली १५ ते २० वर्षे झाली व्यवस्थित भूसंपादन न झाल्यामुळे अनेक गावांचा विकास रखडला आहे. नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.हे दोन्ही मुद्दे मार्गी लावण्यासाठी हणमंत शेळकेंनी निवेदना द्वारे विनंती केली आहे.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी निवेदन व्यवस्थित समजून घेऊन त्यांच्या स्विय सहाय्यकाकडे दिले व पुढील कार्यवाही साठी नोंद करण्यास सांगितले.केंद्रीय वाहुतक मंत्री नितीन गडकरी हे कार्यकुशल,कार्यसम्राट नेते असून त्यांनी फक्त रस्ते न जोडता देश जोडण्याचे व देश एका नव्या विकासाच्या उंचीवर नेण्याचे काम केलेले आहे.अशी भावना हणमंत शेळके यांनी व्यक्त केलेली असून हे प्रश्न मार्गी लागतील.असा विश्वास हणमंत शेळके यांना वाटत आहे.प्रश्न समजून घेतल्या बद्दल हणमंत शेळके यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार मानले.शिवाय हे प्रश्न केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे घेऊन जाता आल्याने भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांचे ही आभार मानले.



# आलेवाडी गावात पाणीपुरवठा योजना मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**संग्रामपूर :** तालुक्यातील आलेवाडी येथील थांबलेल्या जलजीवन मिशन 150 गाव पाणीपुरवठा योजने अंतर्गत आमदार डॉ. संजय कुटे यांनी संबंधित यंत्रणेला धारेवर धरत वरिष्ठ पातळीवरून ही योजना कुटे यांनी मंजूर करून घेतली त्यामुळे आलेवाडी वासियांना थंड गोड पाणी प्यायला मिळणार आहे. केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन योजने अंतर्गत ही योजना मंजूर करून या योजनेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली यावेळी उद्घाटनाप्रसंगी तालुक्यातील ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

मतदारसंघाला लागलेला अभीशाप आमदार संजय कुटे यांनी पुसून टाकला आहे. या गोड थंड पाण्यामुळे कित्येकांचे प्राण वाचले सातपुड्यातील आदिवासी गावांची क्षारयुक्त पाण्यातून सुटका केली आहे. मतदारसंघाच्या विकासाचा कायापालट करताना त्यांनी सर्वसामान्यांना सोबत घेऊन न्याय मिळवून दिला आहे. विदर्भात जळगाव जामोद मतदारसंघाची त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. मतदार संघाचा विकास करताना रस्ते, फुल, घरकुल, सिंचन प्रकल्प, यासाठी निधी कमी पडू दिला नाही. कोरडवाहू शेती सिंचनाखाली यावी यासाठी जलसंधारणाची कामे मतदार संघात खेचून आणली येणाऱ्या काळात सिंचन प्रकल्पाचे काम शेवटच्या टप्प्यात असून लवकर पूर्ण होऊन मतदारसंघात हरितक्रांती झाल्याशिवाय राहणार नाही.



# भीमराज दाणे पाटील ग्रामसेवक संघटना राज्य कोषाधक्षपदी बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** दि २३ जुलै रोजी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना DNE- १३६ ची राज स्तरीय सभा दौलताबाद येथे राज्य अध्यक्ष संजय निकम यांचे अध्यक्षतेखाली संपादक उमेशचंद्र चुल्बुले भारतीय कर्मचारी महासंघ , एल. जी. गायकवाड ( माजी राज्याधाम ), सुचिम घरत ( राज्य सरचिटनीस ) शिवाजी सोनवणे कायदे सल्लागार प्रमुख पाहुने उपस्थित होते. या सभेत भिमराज दाने पाटील यांची राज्य कोषाध्यक्ष पदी बिनविरोध निवड करणात आली. भिमराज पाटील दाणे यांना राज्य कोषाधक्षपदी नियुक्ती बद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी आर. डी. चौधरी ग्रामसेवक संघटना, प्रविण बापू नलावडे सरचिटणीस,बळीराम राठोड ,सुरेश काळवणे,गणेश धनवई,रमेश पाटील, रवि नाईक, संतोष मरमट, सागर डोईफोडे , कर्मचारी व ग्रामसेवक यांची उपस्थित होते.

# 'मेरी माटी मेरा देश' अभियानांतर्गत शिलालेख फलकाचे उद्घाटन...

आधुनिक केसरी न्यूज

**जत/सांगली :** माडग्याळ येथे ग्रामसचिवालय कार्यालयासमोर स्वातंत्र्यदिनाच्या अमृत महोत्सव प्रसंगी माझी माती माझा देश अभियानांतर्गत स्वातंत्र्य सैनिकांचे नातेवाईक, माझी सैनिक व त्याचे नातेवाईकांचा सत्कार करण्यात आला. संखचे अपर तहसीलदार श्री सुधाकर मागाडे, माडग्याळचे सरपंच सौ. अनिता माळी, व माजी सैनिकांच्या हस्ते शिलालेखाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्वातंत्र्य सैनिकांचे कुटूंबीय, माजी सैनिक, तसेच कर्त्तव्य बजावत असलेले जवान, माडग्याळचे तलाठी, मंडलअधिकारी, सरपंच, सदस्य व ग्रामस्थांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. तसेच *वीरो को वंदन* असे कार्यक्रम संपन्न करण्यात आले आहे. सर्व माजी सैनिकांचा हार,शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मंगलमय वातावरणामध्ये स्वातंत्र्य सैनिक यांचे नातेवाईक व वीर जवान यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संखचे अपर तहसिलदार श्री सुधाकर मागाडे यांनी सोमवार चार ते पाच वेळेत कार्यक्षेत्रातील सर्व वीर जवानांसाठी राखिव वेळ ठेवणार असून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे घोषित केले. या कार्यक्रमाचे नियोजन ग्रामपंचायतचे सदस्य महादेव माळी, लिंबाजी माळी, प्रवीण सावंत, अंबू कांबळे यांनी यशस्वीपणे केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सिध्देश्वर कोरे सर यांनी केले .



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अ‍ॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118


www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# ऐतिहासिक अंतुर किल्ल्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

## पाळीव जनावरांचा मुक्त संचार : किल्ल्याची सुरक्षा रामभरोसे





आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील नागापूर जवळील अंतूर किल्ल्याची देखरेख न होत असल्याने त्याच्या सुरक्षितेचा प्रश्न एरनीवर आला आहे. पावसाचा सरीमध्ये अनेक पर्यटक नैसर्गिक आंनद लूटन्या करिता येथील किल्ल्यावर येण्यासाठी आकर्षक होतात. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्ष्य मुळे ऐतिहासिक किल्ला इतिहास मध्ये बंद होण्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

तसेच येथे असलेल्या वनराईमध्ये पाळीव जनावरांचा मुक्त संचार सुरु आहे . हा बाहेरून किल्ला सुस्थितीत दिसत असला तरी पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे पाळीव जनावरांचे कुरण बनले आहे . तसेच काही आतील काही भागांची दुरवस्था झाली असूनही पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हा ऐतिहासिक ठेवा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे . या किल्ल्यावर तीन भव्य प्रवेशद्वार अनेक ऐतिहासिक वास्तू, तळे, भक्कम तटबंदी, भुयार घर, आजही सुस्थितीत आहे . परंतु पुरातत्त्व विभागाच्या दुर्लक्षामुळे किल्ले अंतूरच्या सुरक्षेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे . चाहीवाजूने भक्कम तटबंदी व आत जाण्यासाठी केवळ एकच मार्ग असल्याने याचा पुरेपूर फायदा घेत पाळीव जनावरे बिनधास्तपणे आत आणून सोडली जातात . यामुळे आतील वास्तूंना धोका निर्माण झाला आहे . अंतूर किल्ल्यावर सुरक्षेसाठी पूर्वी येथे दोन रक्षकांची नेमणूक होती . कोरोना काळानंतर दोन पैकी एका कंत्राटी रक्षकाला कामावरून कमी करण्यात आले आहे . किल्ल्याच्या सुरक्षेचा भार केवळ एका सुरक्षकावरच असल्याने पाळीव जनावरांबरोबरच पर्यटकांना कडून पसरविण्यात येणारी अस्वच्छता , प्लास्टिक कचरा , मेजवाण्याही वेगळीच समस्या आहे . दोन महिन्यांपूर्वी नाशिक येथील जय बाबाजी भक्त परिवारातर्फे किल्ल्याच्या संपूर्ण परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आला होता . पुरातत्त्व विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन हा ऐतिहासिक वारसा जतन करावा , अशी नागापूर जवळील अंतूर किल्ल्याची रामभरोसे असलेली सुरक्षा व्यवस्था दिसत आहे तसेच येथील अंतूर किल्ल्यावर परिसरात सर्रासपणे चरायला सोडलेली जनावरांचा वावर दिसत आहे, सर्व बाबी लक्ष्यात घेत या ठिकाणी संबंधित विभागा कडून लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे .तसेच सुरक्षेसाठी पुढाकार घ्यावा -मागील कित्येक वर्षापासून अंतूर किल्ल्यावर जनावरे सोडण्यास मनाई होती. परंतु काही दिवसापासून किल्ल्यात जनावरे सोडण्यात येत असल्याने या ठिकाणच्या ऐतिहासिक ठेव्याचे मोठे नुकसान होत आहे . जनावरे चारा तर खातच आहे त्यासोबत शेनाची घान करीत आहे रिमझिम पाऊस आल्यास मुळे दुर्गंधि पसरत आहे यासाठी संबंधित विभागाने वेळीच लक्ष देऊन अंतूर किल्ल्याच्या सुरक्षेसाठी पुढाकार घ्यावा , अशी निसर्ग प्रेमी कडून मागणी होत आहे,

**किलल्या कड़े जाण्याचा रस्त्याची दयानीय बिकट अवस्था**

मागील काहि वर्षा पूर्वीच या किल्याची डागबुजी करण्यात आली होती, या किल्याची संवर्धन साठि शासनाने लाखो रुपये खर्च केली होती, भयानक सुरूंग बनलेला किल्ला डागबुजी नंतर पुनरजीवित झाला होता थोड़ा काळ होताच परिस्थिति जस ना तसच होण्याच्या मार्गवर आहे, किल्ल्यावर प्रवेश द्वार भल्या मोठ्या प्रमाणात लकड़ी वस्तु ने उभारलेला आहे, त्याला पन वेळीच बगितले नाही तर तेहि सुद्धा कालबाह्य होऊ शकतो पाऊसाची सलग सरी सुरु असल्या कारनाने अनेक जागी किल्याची भींत कोसळल्याची चित्र दिसत आहे, शासनाने सर्व प्रथम येथे जानाच्या रास्ता नागापुर ते किल्ल्ले अंतूर एकदम खिळखिळ झाला आहे हा रस्ता प्रशासनाने तत्काळ दुरुस्तिला सुरवात करावी अशी मागणी येथील नागरिकांसह निसर्ग प्रेमी करीत आहे



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 15 ऑगस्टला सर्वत्र देशभक्तीपर वातावरण असताना चंद्रपूर येथे अबीर अजय साखरकर या चिमुकल्याने देशभक्तीची गाणी गुणगुणत देशभक्तीचा परिचय दिला.**



# स्वातंत्र्यसेनानी रंगनाथ हिवाळे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** भारत छोडो आंदोलन वर्धापनदिन व स्वातंत्र्योत्तर काळातील स्वातंत्र्यसैनिक यांचा सत्कार शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आला असून स्वातंत्र्यसेनानी रंगनाथ आप्पा हिवाळे यांचा सत्कार करण्यासाठी पैठण उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी सोहम वायाळ यांनी बिडकिन येथे निवासस्थानी येऊन सत्कार केला.

स्वातंत्र्य सैनिकांच्या यादीतील सहा पैकी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्याच्या बिडकिन येथील स्वातंत्र्यसेनानी रंगनाथ आप्पा हिवाळे यांचा केंद्र शासनाच्या विभागाच्या वतीने हा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी पैठण उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी सोहम वायाळ यांनी स्वातंत्र्यसेनानी रंगनाथ आप्पा हिवाळे यांच्याशी तब्येतीची बाबत माहिती घेतली व तब्येतीची काळजी घ्यावी अशी विनंती केली.यावेळी सहायक पोलिस निरीक्षक गणेश सुरवसे ,पत्रकार नंदकुमार वैद्य,हसन चाऊस, तमीजोद्दीन इनामदार,संभाजी देशमुख साहेब मंडळ अधिकारी, सचिन काशीकर साहेब तलाठी, रवींद्र मोखेडे साहेब तलाठी,आहेर साहेब तलाठी पोकळे मॅडम तलाठी, चंद्रसेन ढोरकुले, कोतवाल किशोर अवचिंदे आदींसह मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल आदींसह बिडकिन व परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# स्वातंत्र्यदिनी संत निरंकारी मंडळातर्फे महारक्तदान शिबिराचे आयोजन

## जनजागृतीसाठी शहरात भव्य वाहन रॅली...

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि. 15 ऑगस्ट हा दिवस संत निरंकारी मंडळातर्फे मुक्तीपर्व दिवस म्हणून साजरा करण्यात येतो तसेच स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मंडळाच्या सिडको शाखेतर्फे 15 ऑगस्ट मंगळवार रोजी सकाळी 8 ते दुपारी 4 या वेळेत श्रीकृष्ण नगर N9 सिडको येथील सत्संग भवन मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.. या निमिताने जनजागृती साठी दि 13 ऑगस्ट रविवार रोजी भव्य वाहन रॅली सुद्धा सिडको हडको परिसरामध्ये मंडळातर्फे काढण्यात आली... या वाहन रॅली मध्ये पुरुष व महिलांसह मुलांची संख्या देखील लक्षणीय होती घाटीत रक्ताचा खूप तुटवडा असल्याने या शिबिरामध्ये नागरीकांनी उस्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्हा संयोजक डी.जी.दळवी तसेच सेवादल क्षेत्रिय संचालक विजयजी बोडखे यांनी केले आहे.



# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज येथे स्वातंत्र्यदिन साजरा



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दिनांक 15 ऑगस्ट 2023 रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज दरेगाव तालुका खुलताबाद येथे साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. प्राचार्य कल्याणराव शेजुळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ येथे प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख व सध्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हे होते. अध्यक्षस्थानी स्वराज्य शिक्षण संस्थेचे" अध्यक्ष माननीय डॉ. प्राचार्य संजय गायकवाड सर हे होते .या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असलेल्या स्वराज्य शिक्षण संस्थेच्या सचिव प्राध्यापिका सौ. शांता भोसले गायकवाड मॅडम व दरेगाव चे सरपंच श्री संदीप गायकवाड, उपसरपंच अजिनाथ खंडागळे तसेच या शाळेचे आजी व माजी सैनिक देशासाठी अहोरात्र प्राण्याची बाजी लावणारे सैनिक उपस्थित होते. महापुरुषाचे प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते डॉ. प्राचार्य शेजुळ सरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. याप्रसंगी बोलताना डॉ. प्राचार्य संजय गायकवाड सर यांनी" महाराजा सयाजीराव गायकवाड" यांचे विचार आणि कार्याचा गौरव करून त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे अनुभव व शिक्षणाबद्दल असलेली असता तळमळ व जिद्द विद्यार्थ्यांना सांगितले याप्रसंगी 2022 23 यावर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला दहावी व बारावी प्रथम द्वितीय तृतीय असे पुरस्कार देऊन डॉक्टर गायकवाड सर यांनी एक नवीन उपक्रम सुरू केलेला आहे. आदर्श विद्यार्थी म्हणून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला कै.तुकाराम गायकवाड यांच्या स्मृति निमित्ताने डॉ. गायकवाड सर यांनी दरवर्षी दोन विद्यार्थ्यांना ११00रू रुपये रोख व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश वेताळ यांनी शाळेचा अहवाल वाचन करून शाळेच्या वृक्षारोपणाबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमासाठी दरेगाव चे प्रतिष्ठित नागरिक आजी-माजी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालनश्री. शिवाजी पडोळे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री. शांताराम कापडणे यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पाणी टंचाईग्रस्त भागात रेन वॉटर हार्वेस्टिंग वरदान: आ. सतीश चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून देवगिरी महाविद्यालयातील भूशास्त्र विभागातर्फे रेनवॉटर हार्वेस्टिंग या विषयी तीन दिवसीय प्रदर्शन व मार्गदर्शन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.प्रदर्शनाचे उद्घाटन मशिप्र चे सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते झाले झाले. उद्घाटन प्रसंगी बोलताना आ. चव्हाण म्हणाले की, निसर्गात विविध बदल होत आहेत, अचानक येणाऱ्या मुसळधार पावसामुळे पाणी वाहून जाते , त्यामुळे 5ते 8टक्केच पाणी जमिनीत मुरते आणि बाकी पाण्याचे बाष्पीभवन होते. अशा वेळी कमी पाऊस पडणाऱ्या क्षेत्रात भूजल पातळी वाढवण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग खूप प्रभावी ठरते. मनपा अधिकारी, शासकीय अधिकारी,कर्मचारी आणि नागरिकांनी या प्रदर्शनास भेट द्यावी असे आवाहनही आ. चव्हाण यांनी केले. तर भूशास्त्र विभाग प्रमुख प्रो अशोक तेजनकर यांनी सोसायटी, छत, कंपाऊंड मधील मोकळी जागा तसेच ग्रामीण भागात शेत, नदी अशा ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टिंग करावे , अशा शब्दांत मार्गदर्शन केले.भूजल प्रदूषण, भूजल साठा यासंबंधी मार्गदर्शन आणि समाजात जनजागृती होण्यासाठी विभागातील विद्यार्थ्यांनी बनवलेले विविध प्रकारचे मॉडेल, लाईव मॉडेल्स, पोस्टर्स, चार्टस छायाचित्रे, थ्रीडी. मॉडेल्स अशा प्रकारचे एकंदर प्रदर्शनाचे स्वरूप आहे. भूशास्त्र विभागातील विद्यार्थी शहरात विविध ठिकाणी जलजागृती करून रेन वॉटर हार्वेस्टिंग संबंधी माहिती देणार आहेत ..संभाजीनगर शहर भूशास्त्रीय दृष्ट्या रेन वॉटर हार्वेस्टिंग साठी उपयुक्त असून भूजल पातळी वाढण्यास यामुळे मदत होईल. शहरी भागात कमी खर्चात रेन वॉटर हार्वेस्टिंग साठी भूशास्त्र विभागातील प्राध्यापक मोफत. तांत्रिक सल्ला देणार आहेत. कार्यक्रमात यावेळी म.शि.प्र मंडळाचे पदाधिकारी शेख सलीम,त्र्यंबक पाथ्रीकर, प्रदीप चव्हाण, विवेक जैसवाल, प्रशासकीय अधिकारी प्रा माळी आणि महविद्यालयाचे ,उपप्राचार्य प्रो दिलीप खैरनार, डॉ अपर्णा तावरे, डॉ अनिल आर्दड , भूशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ रंजना गावडे तसेच इतर प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रदर्शन आणखी दोन दिवस १७ व १८ ऑगस्ट रोजी सकाळी 10ते 1 पर्यंत सर्वासाठी खुले राहणार आहे तरी शहरातील नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. अशोक तेजनकर यांनी केले आहे.

# वर्षा मॅरेथॉन व राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील कला क्रीडा सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील गुणी कलाकार व खेळाडू यांच्या कलागुणांना वाव मिळावा,त्यांनी आपल्या कलेने प्रतिभेने तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे या हेतूने पक्ष विरहीत अशी द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशनची स्थापना करण्यात आली. या द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्याच्या 76 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हास्तरीय शालेय तसेच खुल्या गटातील 23 वी द्रोणागिरी वर्षा मॅरेथॉन स्पर्धा व राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते गेली 22 वर्षे या क्रिडा महोत्सवाचे आयोजन द्रोणागिरी स्पोर्टस असोशिएशन करत आहे.दि 11 ऑगस्ट 2023 ते 13 ऑगस्ट 2023 दरम्यान उरण शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान येथे राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा संपन्न झाली. तर दि 13 ऑगस्ट 2023 रोजी सकाळी 8 वाजता बोकडविरा चारफाटा सेझ मैदान, पेट्रोल पंपा जवळ उरण येथे जिल्हास्तरीय वर्षा मॅरेथॉन स्पर्धा संपन्न झाली. फुटबॉल स्पर्धा व मॅरेथॉन स्पर्धा या दोन्ही स्पर्धांना खेळांडूचा, जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला.जिल्हास्तरीय मॅरेथॉन मध्ये जवळजवळ 4500 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. तर राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत 16 संघानी सहभाग घेतला. स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्यानंतर 13 ऑगस्ट 2023 रोजी संध्याकाळी 6 वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान उरण शहर येथे विजेत्या खेळाडूंचा शाल,सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत 10 किलोमीटर मुली मध्ये प्रथम -मयुरी चव्हाण,द्वितीय क्रमांक-मोना पटवा,तृतीय क्रमांक-कोमल भिसो यांनी पटकाविला.मुलामध्ये प्रथम क्रमांक -अभिनंदन सूर्यवंशी, द्वितीय -राज भगत, तृतीय- भानू यादव यांनी पटकाविले. मॅरेथॉन स्पर्धा मध्ये विविध वयोगटातील विद्यार्थी आणि धावपटूनी तसेच उरण अभिमान दौड मध्ये जेष्ठ नागरिकांनी आणि मान्यवरांनी सहभाग घेतला. यावेळी संस्थापक अध्यक्ष महादेव घरत,महिला विभाग प्रमुख वैशाली घरत,उपाध्यक्ष मनोज पडते,खजिनदार शिवेंद्र म्हात्रे, सचिव दिलीप तांडेल, क्रीडा प्रमुख भरत म्हात्रे, विजय पाटील, सचिन पाटील, प्रवीण तोगरे, इरफान खान, किरण घरत, प्रविण घरत, नयन पाटील, जयेश पाटील, रविंद्र पाटील,सुनीत घरत आदी मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी द्रोणागिरी स्पोर्टस असोशिएशनच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

# वकिलांच्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी व्हावा : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ज्ञानाचा उपयोग स्वतःसाठी न करता समाजाच्या कल्याणासाठी केल्यास खऱ्या अर्थाने तुमचे कार्य सार्थकी लागेल. कारण आपण सारेच समाजासाठी काहीतरी देणे लागतो, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

बार काऊन्सील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांच्या सहकार्याने चंद्रपूर-गडचिरोली बार असोसिएशनच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ना. श्री. मुनगंटीवार बोलत होते. यावेळी बार काऊन्सील ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे अध्यक्ष विवेकानंद घाटगे, उपाध्यक्ष उदय वारुंजीकर, सदस्य पारिजात पांडे, सीएलईपीचे अध्यक्ष संग्राम देसाई, सदस्य गजानन चव्हाण, प्रमुख पाहुणे ॲड. रविंद्र भागवत, राजेंद्र उमप, चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष अभय पाचपोर, गडचिरोली जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष रविंद्र दोनाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

**कर्तृत्वाचा ठसा उमटवा :** चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील तरुणांनी विधी शाखेत स्वत :च्या कर्तृत्वाचा ठसा उमटवावा आणि देशाच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तीपदाचे स्वप्न बघावे . तुमचे यश आकाशालाही हेवा करायला भाग पाडेल, अशी भावना ना . श्री . मुनगंटीवार यांनी व्यक्त केली . तसेच चंद्रपूर व गडचिरोली येथील विद्यार्थ्यांची निवड केल्याबद्दल बार काऊन्सीलचे त्यांनी अभिनंदनही केले .

मुनगंटीवार म्हणाले, 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करून आपण शताब्दीच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. या काळात देशाचा हॅपिनेस इंडेक्स ही अत्यंत महत्त्वाची बाब ठरणार आहे. हा हॅपिनेस इंडेक्स धनावर अवलंबुन नाही. पैसा आवश्यक आहेच, पण त्यासोबत ज्या क्षेत्रात आपण काम करतो त्या क्षेत्रात झोकून देत आनंदाने काम करणेही महत्त्वाचे आहे. आयुष्यात यश प्राप्त करायचे असेल तर शास्त्र सांगतं त्याप्रमाणे अंतर्मनातून प्रयत्न करावे लागतात. आपण विधी शाखेत कार्यरत आहात आणि आपल्याला न्यायमूर्ती व्हायचे असेल तर अंतर्मनातून संकल्प करावा लागेल. जसे आईच्या हातून घरातल्या लाख वस्तू खाली पडतील पण तिच्या हातून दहा दिवसाचं चिमुकलं बाळ कधीच खाली पडत नाही. कारण ते बाळ तिच्या अंतर्मनात असतं. त्याचप्रमाणए आपणही अंतर्मनापासून सर्वस्व झोकून काम केले तर यश नक्कीच प्राप्त होणार.'

कुठलेही काम करताना प्रथा, परंपरा, शिष्टाचार याचाही विचार करावा लागतो. 'मै और मेरा परिवार बाकी सब बेकार' अशी भूमिका ठेवून चालत नाही. आधुनिक काळात माणसाचे स्वार्थीपण वाढत आहे. लोकांना संविधानात आपल्यासाठी असलेले मुलभूत अधिकार माहिती आहेत, मात्र संविधानाने सोपविलेल्या जबाबदाऱ्यांचा विसर पडला. चांगल्या विचारांवरील कृतीची पवित्रता आपल्या आचरणातून वाढत असते. अशा आचरणाची आणि समाजाच्या कल्याणाची कृती आपल्याला करायची आहे, असेही मुनगंटीवार म्हणाले.





# शेलुखडसे येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त संरक्षण सेवेतील जवानांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** गेल्या वर्षभरापासून संपूर्ण देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जात आहे. सदर उत्सवाचा समारोप आज १५ ऑगस्ट रोजी होणार असल्याने, यावर्षीचा १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन आगळ्यावेगळ्या रूपात साजरा करण्यात आला आहे. देशभक्तीची भावना आणि देशाप्रतीचे आपले प्रेम व आदर व्यक्त करण्यासाठी ठिकठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने शेलुखडसे येथे ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने संरक्षण सेवेत कार्यरत असलेले व सद्यस्थितीत रजेवर असलेल्या गावातील जवानांचा सत्कार करण्यात आला आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या नगण्य स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक यांच्या बलिदानाचे या दिवशी स्मरण केल्या जाते. त्यांनी मिळून दिलेले स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आपले संरक्षण दल अहोरात्र सज्ज असते. अशा जवानांविषयी प्रेम, कृतज्ञता आणि गौरव व्यक्त व्हावा या उद्देशाने येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी संरक्षण सेवेत कार्यरत असलेले सचिन नामदेव बाजड व उमेश उद्धव पारडे या सैनिकांचा स्वातंत्र्यदिनानिमित्त सत्कार केला आहे.

याप्रसंगी कार्यक्रमास उपसरपंच नारायण खडसे, सरपंच प्रतिनिधी तथा ग्राम पंचायत सदस्य विठ्ठल उद्धव पारडे, सदस्य जगन खडसे, आकाश खडसे, जगु खडसे, गावातील सामाजिक कार्यकर्ते आर. बी. खडसे, सुधाकर खडसे, ज्ञानेश्वर खडसे, भानुदास ताकतोडे, विजय शिरसाट आदीसह बहुसंख्य गावकरी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यालयात ७६ वा वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण संस्था सावळदबारा, शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक व कै. लक्ष्मणराव भिमराव कोलते पा वरिष्ठ महाविद्यालय व इंग्रजी प्राथमिक शाळा यांच्या सयुक्त विद्यमाने आज 15 ऑगस्ट 23 रोजी 76 व्या भारतीय स्वातंत्र दिनानिमत्ताने संस्थाध्यक्ष भावराव कोलते यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले याप्रसंगी सर्व संचालक मंडळ उपस्थित होते प्राचार्य कोलते नारायण सर हेही उपस्थित होते सर्व शिक्षक बंधू व वर्ग 1 ली ते पदवी पर्यत सर्व विद्यार्थी उपस्थित होते. ध्वजारोहनानिमित्त अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते भाषण स्पर्धा, गीतगायन, नाटिका आयोजित करण्यात आल्या होत्या यावेळेस अनेक देशभक्तीपर गिते, देशाविषयीं प्रेम व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर खमाठ, विजयसिंग राजपूत, सुदाम राठोड यांनी सयुक्तरित्या केले यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक पालक व पोलीस बंधू व आजी माजी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य सोसायटी चेअरमन व गावातील उत्कृष्ट व निर्भीड पत्रकार गोकुळसिंग राजपूत, रहीम पठाण, सुनील चोरमाले, जब्बार शामद तडवी उपस्थित होते पत्रकारांनी सुद्धा सर्व विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन मोनोबल वाढविले.

